गुरुवार, ६ जुलै २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२९१
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●THURSDAY 06 JULY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-291 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5

# दादांचे वार! काकांचे पलटवार!!








## तर पवाराची औलाद सांगणार नाही

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** २०१७ ला वर्षा बंगल्यावर चर्चा झाली. मी, सुनील तटकरे, जयंत पाटील आणि अजून एक असे चार जण होतो. समोर सुधीर मुनगंटीवार, देवेंद्र फडणवीस, विनोद तावडे, चंद्रकांत पाटील हे चौघे होते. कुठली खाती, कुठले पालकमंत्रीपदे हे सगळे ठरले होते. मी खोटे बोलत नाही. खोटे बोललो तर पवाराची औलाद सांगणार नाही. आम्हाला निरोप आला. सुनील तटकरेंना दिल्लीला बोलवले. त्यांच्या वरिष्ठांनी सांगितले २५ वर्षांचा आमचा मित्रपक्ष असणाऱ्या शिवसेनेला आम्ही सोडणार नाही. ते म्हणाले शिवसेनाही आघाडीत राहील. आपल्या वरिष्ठांना ते मान्य नव्हते. ते म्हणाले 'शिवसेना आम्हाला चालणार नाही. शिवसेना जातीवादी आहे, असा गौप्यस्फोट करत अजित पवारांनी थेट शरद पवारांवर टीकेचे वार केले.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेली फूट सध्या राज्यात चर्चेचा विषय ठरली आहे. बुधवारी त्याचे पडसाद राज्याच्या राजकारणात उमटताना पाहायला मिळाले. अजित पवार गटाची मुंबईत बैठक, सभा व शक्तिप्रदर्शन झाले. यावेळी अजित पवारांनी त्यांची सविस्तर भूमिका स्पष्ट केली. शरद पवारांना लक्ष्य करताना त्यांच्या विविध भूमिकांवर तीव्र आक्षेप नोंदवला. यावेळी अप्रत्यक्षपणे अजित पवारांनी शरद पवारांवर निवृत्तीसंदर्भातही टीका केली. ते पुढे म्हणाले की, २०१४ मध्ये प्रफुल्लभाईंचे शरद पवारांशी बोलणे झाले. नंतर प्रफुल्लभाईनी जाहीर केले की आम्ही बाहेरून भाजपाला पाठिंबा देतो. आम्ही गप्प बसलो. का ? तर नेत्यांनी निर्णय.

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले. आम्हाला सांगितले की सगळ्यांनी वानखेडेला शपथविधीला जा. नरेंद्र मोदी मला ओळखतात. ते आमच्याशी बोलले. तेव्हा त्यांच्याबरोबर जायचे नव्हते तर आम्हाला तिथे का पाठवले ? मंत्रिमंडळाच्या शपथविधीला का पाठवले ? असा सवाल अजित पवारांनी शरद पवारांच्या निर्णयावर उपस्थित केला.



**तुम्ही थांबणार आहात की नाही ? :** वय जास्त झाले . 82 झाले , 83 झाले, तुम्ही कधी थांबणार आहात की नाही ? तुम्ही आशीर्वाद द्या . तुम्ही शतायुषी व्हा . मला सांगितलं राजीनामा देतो आणि संस्थेची कामे पाहतो . राजीनामा दिल्यावर एक कमिटी करतो . ती कमिटी केल्यावर तुम्ही बसा आणि बसून सुप्रियाला राष्ट्रीय अध्यक्ष करा . आम्ही तयार झालो . तेही आम्हाला मान्य होते . त्यानंतर दोन दिवसात सांगितले राजीनामा मागे घेतला . मागे घेतला तर दिला कशाला ? मी सुप्रियाला सांगितलं त्यांना सांग . ते हट्टी आहेत . पण असा कुठला हट्ट आहे . आमदारांना फोन केला जात आहे . ते भेटले नाही तर त्याच्या पत्नीला फोन करून भावनिक केले जाते, असा गौप्यस्फोटही त्यांनी केला .

**सोनिया गांधींना परदेशी ठरवले :** 1999 ला निवडणूक घेतल्या . तेव्हा काँग्रेस एकत्र होती . त्यानंतर सोनिया गांधी परदेशी आहे, असे सांगितले . परदेशी व्यक्ती पंतप्रधान होऊ शकत नाही, असे सांगितले . आम्ही ऐकले . त्यानंतर राष्ट्रवादीचा जन्म झाला . चार महिन्यात निवडणुका लागल्या . त्यावेळी संपूर्ण मैदान गाजवण्याचं काम भुजबळ यांनी केलं . आर आर पाटील, सुनील तटकरे, जयंत पाटील, मी आम्ही सर्व तरुण होतो . काही तरी करावं आम्हाला वाटत होतं . सुजलाम सुफलाम महाराष्ट्र घडवायचा होता . पण त्यावेळी आपल्याला फक्त 58 जागा मिळाल्या . काँग्रेसला राज्यात ताकदीचा नेता नसताना 78 जागा मिळाल्या . विलासराव मुख्यमंत्री झाले . आम्ही सत्तेत गेलो . कामे केली, असं त्यांनी सांगितले . मला फक्त सात जिल्ह्याचे खाते मिळाले . प्रशासनावर माझी पकड आहे की नाही हे महाराष्ट्र जाणतो . मी जातीपातीचं नात्यागोत्याचे काम केले नाही . प्रत्येक कार्यकर्त्याचे काम करतो . पहाटे कामाला सुरुवात करतो . आजही करतो . महाराष्ट्र पुढे जावे म्हणून हे करत असतो . देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य म्हणून मी काम करत असतो, असेही त्यांनी सांगितले .

## माझी तक्रार नाही पण दुःख आहे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्रात काही लोकांनी बाजूला जायची भूमिका घेतली. माझी तक्रार नाही पण दुःख आहे. कारण लोकांनी त्यांना निवडून दिले आहे. कार्यकर्त्यांनी अपार मेहनत केली होती. जो राजकीय विचार आपल्याला मान्य नाही त्याच विचारांच्या पंक्तीला जाऊन बसणे योग्य नाही. एवढेच मला आज सांगायचे आहे, असे म्हणत शरद पवार यांनी अजित पवारांनी केलेल्या वारांवर पलटवार केले.

ते पुढे म्हणाले की, आपले नाणे खोटे आहे, याची खात्री आमच्या मित्रांना आहे. त्यामुळेच त्यांच्या बैठकीत आणि मेळाव्यात माझा मोठा फोटो लावण्यात आला. आज काही लोकांनी भाषणे केली. बोलताना सांगत होते शरद पवार आमचे गुरु आहेत. आमच्या मित्रांचा मेळावा झाला त्यात फोटो पाहिले का ? सगळ्यात मोठा फोटो होता माझा. मुंबईत पोस्टर लावली की फोटो माझा. त्यांना माहित आहे आपले नाणे चालणार नाही. त्यामुळे चालणारे नाणे घेतले पाहिजे. त्यांचे नाणे खरे नाही ते खणकन वाजणार नाही अडचण नको म्हणून त्यांनी माझा फोटो वापरला आहे. पांडुरंगाच्या दर्शनाला बडवे जाऊ देत नाहीत असाही आरोप झाला. कसले बडवे ? पांडुरंगाच्या दर्शनाला जायचे असेल तर कुणी अडवत नाही. पांडुरंग म्हणायचे, गुरु म्हणायचे आणि आमच्याकडे दुर्लक्ष झाले म्हणायचे ही गंमतीची गोष्ट आहे, असे मला वाटते असेही शरद पवार यांनी म्हटले आहे.

एक तर आपले सहकारी आहेत ते म्हणाले हे काही चालले आहे ते बरोबर नाही. मी काय चालले आहे ते बघून येतो आणि तुम्हाला कळवतो असे मला सांगितले. त्यानंतर मला त्यांनी शपथ घेतल्याचाच फोन केला. असे म्हणत शरद पवार यांनी छगन भुजबळांना टोला लगावला आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदींना टोला :** एकदा पंतप्रधान बारामतीत आले होते . त्यांनी सांगितलं देश कसा चालवायचा हे पवारांचं बोट धरुन मी शिकलो . निवडणुकीच्या काळात आले तेव्हा प्रचंड टीका केली . जे देशाचं नेतृत्व करतात त्यांनी बोलत असताना विशिष्ट काळजी घ्यावी लागते . जे सत्य आहे तेच सांगितले पाहिजे . पण तेवढी धमक पंतप्रधानांनी दाखवली नाही . आपण देशाचे नेता म्हणून जनमानसासमोर बोलतो त्यावेळी मर्यादा पाळली पाहिजे . त्या मर्यादा पाळल्या जात नाही असं म्हणत शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली . बरे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जी टीका केली तर राष्ट्रवादी काँग्रेसला सत्तेत का घेतले ? याचा अर्थ असा आहे की हे सत्ताधारी वाट्टेल ते बोलतात आणि जनमानसात एक प्रकारचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करतात . असंही शरद पवार यांनी म्हटले आहे .

**राज्यकर्त्यांचा संवाद संपला आहे :** मी महाराष्ट्राचा चारवेळा मुख्यमंत्री झालो . निर्णय घेतल्यानंतर सामान्य माणसांना काय वाटतं आहे हे ऐकून घ्यावं लागतं . आज देशात संवाद तुटला आहे . आम्ही सगळेजण सत्ताधारी पक्षात नाही . आम्ही लोकांमध्ये आहोत . त्यामुळेच कधीकाळी सामान्य माणसाची जी स्थिती समजते त्यातून मार्ग काढण्याची इच्छा असते पण राज्यकर्त्यांचा संवाद नसेल तर या गोष्टीतून मार्ग काढता येत नाही . आज देशामध्ये कमालीची अस्वस्थता जनतेत आहे . दुसऱ्या बाजूला आम्ही लोकांनी प्रयत्न सुरु केले की लोकशाही टिकवायची असेल तर संवाद सुरु करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे . त्यासाठी आम्ही सत्ताधारी पक्षात जे नाहीत त्यांना बरोबर घेऊन चर्चा केली . १७ आणि १८ तारखेलाही आम्ही एकत्र येत आहोत . हे जसे घडायला लागले तशी ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांच्यात अस्वस्थता निर्माण झाली . देशाच्या पंतप्रधानांनी आठ दिवसांपूर्वी एक भाषण केलं . त्यावर त्यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर भ्रष्टाचाराचे आरोप केले .

## उच्च शिक्षणात आदिवासी महिलांचा वाढलेला टक्का आशादायी : राष्ट्रपती

आधुनिक केसरी न्यूज


**गडचिरोली :** विविध कारणांनी मागास समजल्या जाणाऱ्या आदिवासी समाजातील महिलांचा उच्च शिक्षणात वाढलेला टक्का आशादायी आहे. सोबतच विद्यार्थिनींची कामगिरीदेखील कौतुकास्पद असून महिला सशक्तिकरणाच्या दृष्टीने हे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले.


गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाच्या १० व्या दीक्षांत समारंभात मुख्य अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. दीक्षांत समारंभात सुमारे ४५ पदवीधर आणि ६१ टक्क्यांपेक्षा जास्त सुवर्णपदक विजेत्या या विद्यार्थिनी आहेत. या विद्यार्थिनींची कामगिरी ही कौतुकास्पद असून महिला सशक्तिकरणाच्या




दृष्टीने हे महत्त्वाचे आहे. इतर विद्यार्थिनींना यापासून प्रेरणा मिळेल. गोंडवाना विद्यापीठ हे या क्षेत्रातील वनसंपदा, खनिज संसाधन, आदिवासींची कला आणि संस्कृतीच्या योग्य विकास आणि संरक्षणासाठी कार्यरत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. मागास समुहाच्या उत्थानात शिक्षणाची भूमिका महत्वपूर्ण आहे. हा समूह पुढे जाऊ इच्छितो. मात्र, त्यासाठी त्यांना संधी उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे आणि गोंडवाना विद्यापीठाने त्यादृष्टीने उचित पावले उचलली आहेत, असे सांगून मुर्मू यांनी विद्यापीठाचे कौतुक केले. केंद्र सरकारने आकांक्षित जिल्ह्यांमध्ये गडचिरोली जिल्हयाचा समावेश केला आहे. त्यामुळे भविष्यात हा जिल्हा प्रगत जिल्ह्यांच्या पहिल्या रांगेत येईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

देशात युवकांची भूमिका महत्वाची आहे. त्यासाठी आपली प्रतिभा आणि कौशल्याचा वापर करुन पुढे वाटचाल केली तर देशाबरोबरच तुमचेही नाव मोठे होईल, असेही मुर्मू म्हणाल्या. याप्रसंगी महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, आदिवासी विकास मंत्री डॉ.विजयकुमार गावीत, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे प्रामुख्याने उपस्थित होते. या दीक्षांत समारंभात राष्ट्रपतींच्या हस्ते उत्कृष्ठ शैक्षणिक कामगिरीसाठी ६ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक प्रदान करून सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपतींच्या हस्ते अडपल्ली येथील गोंडवाना विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीचे 'ऑनलाईन' पद्धतीने भूमिपूजनही करण्यात आले. यावेळी त्यांनी राष्ट्रपती पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर महाराष्ट्राची ही आपली पहिलीच यात्रा असून या दौऱ्यादरम्यानचा पहिलाच कार्यक्रम युवा पिढीशी निगडित असणारा दीक्षांत समारोह आहे, असेही सांगितले. राज्यपाल रमेश बैस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुद्धा आपले विचार व्यक्त केले. या समारोहाला लोकप्रतिनिधी, सिनेट व व्यवस्थापन समितीचे सदस्य, विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांचे संस्थापक, प्राचार्य आणि विद्यार्थी उपस्थित होते.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

ती आपल्या माहेरी परत जाऊ शकली असती. रुख्मिणी तिला विचारते, ' मग काय आहे तुमच्याकडे ? कसा चालतो तुमचा संसार ?' त्यावेळी आवली उपरोधिकपणे तुकारामबुवांचा अभंग वापरून उत्तर देते, ' आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने...' त्यावेळी प्रेक्षक अंतर्मुख होतात.
रुख्मिणी विचारते, ' मग तू निघून का जात नाहीस ?' त्यावर आवलीने दिलेले उत्तर सर्वांच्याच डोळ्यात अंजन घालणारे आहे. ती म्हणते, ' निघून जाऊन काय करू ? मी आहे म्हणून त्यांना जेवण तरी मिळते. माझ्यासारख्या सामान्य स्त्रीला रुसून निघून जाण्याचा अधिकार कुठे आहे ? मी काही रुख्मिणी थोडीच आहे रुसून निघून जायला ? आणि निघून गेल्यावर घरी परत यावंसं वाटलं तर आल्यावर घर तरी जागेवर असेल का ? मग कुठे जायचं ?' यातून तिने रुख्मिणीला बोध तर केला आहेच पण आजकाल क्षुल्लक कारणावरून नवऱ्यावर चिडून घरातून निघून जाणाऱ्या मुली, काही झाले की लगेच घटस्फोट घेणाऱ्या मुली यांच्यासाठीही दोन मोलाचे शब्द यातून तिने सुनावले आहेत असे वाटते. एकदा का घर सोडून निघून गेल्या आणि नंतर परत यावेसे वाटले तरी घर ( पती ) जागेवर असेलच याची शाश्वती कोणी द्यावी ? रखुमाई म्हणते, ' मी आणि तू दोघं गाभाऱ्याच्या बाहेर आहोत, पण तू मात्र गाभाऱ्याबाहेर राहूनही गाभाऱ्याचा घुमारा झालीस. ' आवली जशी रुख्मिणीला तिची चूक दाखवून देते, तशीच रुख्मिणी सुद्धा आनंदाने जीवन जगण्याचा मार्ग आवलीला सांगते. ती पावसात आवलीला घेऊन जाते. हात पसरून सांगते, ' बघ पावसात असं मनसोक्त भिजायचं असतं सगळं विसरून. मुक्त, आनंदी व्हायचं असतं. ' या नाटकातील संवाद असेच हृदयाला हात घालणारे आहेत. नाटकाचा काळ प्राचीन असला तरी आजही हे संवाद स्त्री मनाची अवस्था स्पष्ट करतात. ' करपायच्या आत खरपूस झाल्या झाल्या उलथायची भाकरी, फोडणी तांबूस झाल्या झाल्या ओतायची भाजीत, उतू जायच्या आत उतरवायचं भांडं ... का ? कडेलोटाच्या क्षणापर्यंत पोहोचून पुन्हा माघारी का गं फिरायचं आपण बायकांनीच ? ' आणखी एका संवादात म्हटलं आहे, रखुमाई आवलीला म्हणते, ' स्वतःसाठी जग.




## संगीत देवबाभळी



## आनंदी पहाट

## आपले सामाजिक स्थान आपणच निर्माण करावे

आधुनिक केसरी


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

शारीरिक, मानसिक, शैक्षणिक, व्यावसायिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या स्वतंत्र वातावरणात वाढलेल्या दोन घराण्यांतील भिन्नलिंगी व्यक्ती एकत्र येऊन त्यांनी जन्मभर एकत्र राहण्याचा विलक्षण प्रयोग समाजाच्या साक्षीने आणि विवाहाच्या रूपाने केला जात असतो. विवाहाच्या नंतरच्या अवघ्या काही कालावधीतच सामाजिक बांधिलकीचे भान दोन्ही कुटुंबांमध्ये शिल्लक राहिले नसल्याचे दिसून येते. एकमेकांवर कुरघोडीचे प्रकार, आर्थिक पातळीवर चढाओढ, हेवेदावे सुरु झाल्याचे दिसू लागते. नवविवाहित उभयतांना देखील विवाह हे एकप्रकारे बंधन वाटायला लागते. परस्परविरोधी वक्तव्ये केली जायला लागतात. अलीकडच्या काही काळात अशा प्रकारच्या घटना अनेकांच्या बाबतीत घडल्याचे समजते. मग त्यांची शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, वैचारिक कुवत काम करणेच बंद होत जाते. विवाहपूर्व होत असलेल्या संवादांची जागा वादाने घेतलेली असते. आजच्या गतिमान, आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात अन्न, वस्त्र, निवारा ह्या किमान प्राथमिक गरजांचा विचार करून फक्त चालत नाही, तर बदलत चाललेल्या जीवनमुल्यांचाही स्विकार करावा लागतो. आज आपल्या आयुष्यातील प्रत्येक सुखात आणि दुःखात आपल्याला शारीरिकदृष्ट्या साथ-सोबत करणारे, मानसिक आधार देणारे, अंतर्मनाला धीर देणारे, आर्थिकदृष्ट्या सक्षमता देऊ करणारे, सामजिक पत निर्माण करणारे, शैक्षणिक प्रगतीची दिशा दाखवणारे, सामाजिक कौटुंबिक एकोपा टिकवणारे, आपली नातीगोती जपणारे, उणीवा दूर करणारे, आपल्या जाणीवा जपणारे, आपल्या जाणीवांना नेणीवेपर्यंत घेवून जाणारे, आपल्या जीवनात अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारे आपले हक्काचे साधन हे दुसरे-तिसरे कोणतेही नसून ते म्हणजे आपल्या सामाजिक बांधिलकीचे नाते असते. आपल्या सर्वांच्या जीवनात अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा विषय म्हणजे, आपले सामाजिक स्थान. ह्या सामाजिक स्थानाचा संबंध थेट आपल्या सामाजिक बांधिलकीशी असतो.



आधुनिक केसरी

**वेदना हरेल | हरि कृपे ||**
आपली वेदना | आपण सहावी ||
दुजा काय दावी | वेड्या मना ||१||
माय गेली गावा | घेऊनी ओलावा ||
मायेचा चकवा | मिथ्या मागे ||२||
चंदनाचे भाळी | झिजण्याचा शाप ||
सुगंधाचे माप | कोण करी ||३||
तुळशीची जागा | जरी अंगणात ||
विराजे कंठात | विठ्ठलाच्या ||४||
ठेव तू चरणी | तुझे कर्मफुल ||
वेदना हरेल | हरि कृपे ||५||


प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

अनुकूलं हि भक्तेभ्यो मधुमत् वचनं तव |
अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं
नमाम्यहम् || ३६ || तुझे मधुर वचन
भक्तांसाठी अनुकूल असते.
अशा तुला दुर्गा देवीला मी
अभीष्टफलाच्या प्राप्तीसाठी नमन करतो.


## घराघरात स्ववेंद, मनामनांत स्ववेंद, जनमनांत स्ववेंद !


स्ववेंद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

नित्य पले पल निगलता,
काल बली संसार ।
कालक मुख मै जा रहा, श्वाँस उश्वाँस विचार
।।३१ ।।(स्ववेंद चतुर्थ मण्डल षष्ठ अध्याय)
०२/०७/३१
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
बलवान काळ या जगाला दिवसेंदिवस गिळत आहे.
श्वास-उश्वास काळाच्या मुखात जात आहे, याचा
विवेक स्वतः मध्ये ठेवा.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली



पुष्प ३४ वे

आधुनिक केसरी



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

गोसावीबुवा म्हणे गीताबाईला
हो, पाहिले आहे मी अशा मुलाला
भेटेल वर्षाने मुलगा तुम्हा पहा
नामस्मरण तुम्ही करीत रहा ।।१ ।।
श्रीमहाराजांची वाणीच गुणांची
करी शांत ती तळमळ मनाची ।।२ ।।
गोंदवलेकर पाटील दाजी अन
बारसवडेकर अण्णाजी म्हणे
नक्की असावा हा गणू आपला
तर्क दोघांनी मनी पक्का बांधला ।।३ ।।
त्यांच्या मना श्रीमहाराजांनी जाणिले
दुसऱ्या पहाटे ते निघूनी गेले
काय घडले पुढे, तुम्हा सांगण्या
अरुणदासास, गुरू देती प्रेरणा ।।४ ।।

## सद्गुरूची कामगिरी

आधुनिक केसरी

सद्गुरूची कामगिरी कोणती ? आरशावर धूळ पडलेली असते, ती बाजूला सारायला सद्गुरू सांगतात; आपले चुकते कुठे ते सद्गुरू सांगतात. सद्गुरू आपल्याला मार्गाला लावतात. स्वप्नामध्ये तलावात पडला म्हणून ओरडू लागला, तोच जागा झाल्यावर ओरडायचा थांबला ! सद्गुरू जागे करण्याचे काम करतात. मला करायचेच काही उरले नाही असे ज्याने म्हटले, त्याने सद्गुरू खरोखर केला असे म्हणावे. एखादा सुखवस्तू गृहस्थ 'मी स्वस्थ आहे' असे म्हणतो, पण ते काही खरे नाही. मन जोवर गिरक्या मारते तोपर्यंत तो स्वस्थ आहे असे नाही म्हणता येणार. शिष्याच्या भावनाच गुरूला गुरुपद देतात. जो शरण जातो त्याचा कार्यभार सद्गुरू उचलतो. ज्याची दृष्टी रामरूप झाली तो खरा गुरू. जे चिरकाल टिकते ते गुरुपद समजावे. खरोखर, सद्गुरू म्हणजे मूर्तिमंत नामच होय. गुरूने सांगितलेले अक्षरशः पाळणे हेच खरे साधन. संत कुणालाही



देहाने कायमचे लाभले नाहीत. संतांना भगवंताचा जो ध्यास असतो तो महत्त्वाचा आहे. पुष्कळांना संतांची गाठ पडते, परंतु सत्संगतीचे महत्त्व न कळल्यामुळे बहुतेकांना त्यापासून जो व्हायला पाहिजे तो फायदा होत नाही. आपली जी कर्तव्ये ठरली आहेत ती आपण बरोबर करावीत. व्यापार थोडक्या प्रमाणात केला तर पुढे वाढतो, त्याप्रमाणे कर्तव्य करीत गेल्याने फलाची आशा आपोआप सुटेल. आपले कर्तव्य कोणते ते सद्गुरू आपल्याला दाखवून देतात. रथ आहे खरा, पण जर त्याला सारथी म्हणजे चालवणारा नसेल, तर रथ कुठेतरीच जाईल. केवळ 'गाडी माझी आहे ' म्हणून ती मालकाला चालविता येणार नाही; साधी बैलगाडी सुद्धा चालविता येणार नाही. आपला देह मनुष्य आपल्या मनाने चालवितो, आणि खड्ड्यामध्ये पडतो. सद्गुरू हे गाडीवानाचे काम करतात आणि आपल्या देहरूपी गाडीला योग्य रस्त्यावरून नेतात. आपण नेहमी भगवंताच्या अनुसंधानात मग्न असावे आणि गाडीवानावर विश्वास ठेवून निर्धास्त असावे, मग कसलाच धोका उरणार नाही; आपल्या नशिबात जेवढे मिळायचे असेल तेवढेच आपल्याला मिळणार, अशी वृत्ती बनून आपले हवेपण कमी होईल. मनाची ही वृत्ती झाली की, जे घडेल ते भगवंताच्या इच्छेनेच घडेल असे आपल्याला वाटू लागेल. असे वाटू लागले की समाधान चालत घरी येईल. पण हे सगळे होण्यासाठी आपल्या अंतःकरणाची शुद्धता हा पाया आहे. **आजचे बोधवचन आहे- संतचरणी विश्वास ।त्याने भगवंत जोडला खास ॥**

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी


विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

आणि या पुड्या घ्या म्हणून सांगता, हे कसे ? त्यावर वैद्याने सांगितले, "पूर्वी जे अजीर्ण झाले आहे त्याचा नाश करण्यासाठी या पुड्या उपयोगी आहेत. त्याप्रमाणे, गुरू आपल्याला नामस्मरण करायला सांगतात ते पूर्वीचा विषयाचा अनुभव नष्ट करण्यासाठीच. तेव्हा जो आपली विषयवासना कमी करून आपल्यामध्ये नामाचे प्रेम उत्पन्न करील तोच खरा सद्गुरू होय. अपरिचित ठिकाणी जाताना जसा मार्ग विचारावा लागतो ,खात्री करून घ्यावी लागते म्हणजे कोणाला तरी विचारावे लागते आणी आपण ते सांगतील त्यावर विश्वास ठेऊन चालू लागतो आणी इच्छित ठिकाणी पोहोचतो तसे या जीवनाची गाडी इच्छित ठिकाणी पोहाचण्या साठी अनुग्रह घ्यावा लागतो. अवतारादिकांचेही श्रीगुरूंशिवाय चालत नाही. श्रीराम वसिष्ठांना शरण गेले होते. तर सांदीपनींना श्रीकृष्णाने गुरू मानले होते.
क्रमशः

## निवडक सुभाषिते


आधुनिक केसरी

धारणाद्धर्ममित्याहुर्धर्मो धारयते प्रजाः ।
यत्स्याद्धारणसंयुक्तं स धर्म इति निश्चयः
स्पष्टीकरण – धर्मासाठी माणूस नसतो, तर माणसासाठी धर्म असतो. त्यामुळे केवळ पोथीवरून धर्माचा अर्थ लावता कामा नये. जो आचरल्यामुळे समाजाचे संरक्षण, संगोपन आणि संवर्धन होईल, तो धर्म समजावा.
धर्माने समाज नीतिमान बनला पाहिजे, उद्योगी बनला पाहिजे आणि त्याचा उत्तरोत्तर उत्कर्ष झाला पाहिजे.
तसे होत नसेल, तर धर्मात कुठेतरी चूक झाली आहे, असे समजावे.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे


आयुष्य फार लहान आहे... जमेल तितका आनंद घ्या
पान ६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरुवार, ६ जुलै २०२३



'सर्जा' पान ७


# राज्यात 20.60 लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राज्यात आत्तापर्यंत 20.60 लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी (sowing) झाली आहे. पुढील काही दिवसांत यात आणखी भर पडण्याची अपेक्षा कृषी अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. महाराष्ट्रातील दुष्काळ निवारण सज्जता, खरीपाची कामे आणि केंद्र सरकार पुरस्कृत तसेच केंद्र सरकारी विभागांच्या योजनांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी अधिकाऱ्यांनी पाऊस आणि सध्याची पेरणीची स्थिती याबाबत सविस्तर माहिती दिली. राज्यात सरासरीपेक्षा 39 टक्के कमी पाऊस पडला आहे. मात्र, जुलै महिन्यात, राज्यात उच्चांकी पाऊस होईल असा अंदाज हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केला.**



महाराष्ट्रातील दुष्काळ निवारण व्यवस्था, खरीपाच्या पेरण्यांची प्रगती आणि इतर कामांचा आढावा घेण्यासाठी केंद्र सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण ( विस्तार ) विभागाचे सहसचिव, सॅम्युअल प्रवीण आणि महाराष्ट्रातील कृषी आयुक्त सुनील चव्हाण यांच्या सह-अध्यक्षतेखाली, पुण्यात बैठक झाली. या बैठकीत, प्रमुख विषयांसह, विविध केंद्र पुरस्कृत योजनांचा तसेच कृषी शी निगडीत विविध केंद्रीय विभागांच्या योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. या बैठकीला राज्यातील सर्व नोडल अधिकारी देखील उपस्थित होते. सोयाबीन आणि कापसा पाठोपाठ, कडधान्ये आणि धान ही राज्यातील प्रमुख खरीप पिके आहेत. केंद्रीय योजनांच्या अंमलबजावणीबाबत, महाराष्ट्र राज्याने 'थेंबा थेंबात अधिक शेती' योजनेची प्रभावी अंमलबजावणी केली आहे. 2022-23 या वर्षात, या योजने अंतर्गत 1,27,627 लाभार्थी शेतकऱ्यांना अनुदान वितरीत करण्यात आले असून 1,12,000 हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

हवामान शास्त्र विभाग, पुणे चे अतिरिक्त महसंचालक के. एस. होसाळीकर आणि हवामान वैज्ञानिक डॉ. एस. डी सानप यांनी जुलै 2023 साठी राज्यातील मोसमी पावसाची स्थिती आणि अंदाज यांची माहिती दिली. आजच्या तारखेला राज्यात सरासरीपेक्षा 39 टक्के कमी पाऊस पडला आहे. मात्र, जुलै महिन्यात, राज्यात उच्चांकी पाऊस होईल, असा अंदाज वेधशाळेने वर्तवला आहे. कोकण विभागात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला असला, तरी मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात मात्र पावसाने ओढ दिली आहे. येत्या दोन आठवड्यात, राज्यात सगळीकडे, सरासरी किंवा त्यापेक्षा जास्त पाऊसमान असेल, हे अनुमान आशादायक आहे.

या बैठकीत, राज्याच्या कृषी विभागाचे संचालक दिलीप झेंडे यांनी राज्यातील कृषीविषयक कामे, विशेषतः मुख्य पिके, पेरण्या आणि महाराष्ट्रात राबवल्या जाणाऱ्या कृषी योजना, यांची माहिती देणारे सविस्तर सादरीकरण केले. तसेच राज्यात दुष्काळ सदृश परिस्थिती उद्‌भवल्यास, त्याचा सामना करण्यासाठी काय सज्जता आहे, या उपाययोजनांचा आढावा घेतला. दुष्काळी परिस्थितीच्या सज्जतेविषयी केंद्राकडून आलेल्या सर्व सूचनांचे तंतोतंत पालन करून त्याची सज्जता केली जात आहे. तसेच, गरजेनुसार पुढेही आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील, असेही असेही झेंडे यांनी सांगितले.

**केंद्राकडून आलेल्या सर्व सूचनांचे तंतोतंत पालन करावे :** या बैठकीत, राज्याच्या कृषी विभागाचे संचालक दिलीप झेंडे यांनी राज्यातील कृषीविषयक कामे, विशेषत : मुख्य पिके, पेरण्या आणि महाराष्ट्रात राबवल्या जाणाऱ्या कृषी योजना, यांची माहिती देणारे सविस्तर सादरीकरण केले . तसेच राज्यात दुष्काळ सदृश परिस्थिती उद्‌भवल्यास, त्याचा सामना करण्यासाठी काय सज्जता आहे, या उपाययोजनांचा आढावा घेतला . दुष्काळी परिस्थितीच्या सज्जतेविषयी केंद्राकडून आलेल्या सर्व सूचनांचे तंतोतंत पालन करून त्याची सज्जता केली जात आहे . तसेच, गरजेनुसार पुढेही आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील, असेही असेही झेंडे यांनी सांगितले .

# ७ लाख हेक्टरवरील पेरण्या रखडल्या

## जुलैमध्येही २५० गावांतील पाणी टंचाईची तीव्रता कायम

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** अपुऱ्या पावसामुळे जिल्ह्यातील तब्बल ७ लाख हेक्टर क्षेत्रावरील खरिपाच्या पेरण्या रखडल्या असून झालेल्या पेरण्या उलटण्याची चिन्हे आहेत. दुसरीकडे जुलैमध्येही २५० गावांतील पाणी टंचाईची तीव्रता कायम असल्याचे चित्र आहे. दमदार पाऊस न झाल्याने सुमारे २९ हजार हेक्टरवरील झालेल्या पेरण्या धोक्यात आल्या आहे. या तुलनेत तब्बल ७ लक्ष हेक्टरवरील पेरण्या अजूनही रखडल्या आहेत. किमान ७० मिलिमीटर वा शेत जमिनीत ४ ते ५ इंच ओल झाल्याशिवाय पेरणी करू नये, असा इशारा कृषी विभागाने दिला आहे. यामुळे लाखो शेतकरी चिंताग्रस्त झाले असून दमदार पावसाची आतुरतेने प्रतीक्षा करीत आहे. या परिणामी मूग,



उडीद या पिकांच्या पेऱ्यात घट येणार आहे. जुलै महिना सुरू झाला असला तरी पाणी टंचाईची तीव्रता कायम असल्याचे गंभीर चित्र आहे. जिल्ह्यातील २२ गावांना २३ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तसेच २३० गावांतील लाखावर ग्रामस्थांची तहान २५७ अधिग्रहित खाजगी विहिरींद्वारे भागविली जात आहे. जुलै लागला तरीही पाऊस अपुराच आहे. ५ जुलै अखेर जिल्ह्यात सरासरी ५४ मिलिमीटर इतकाच पाऊस झाला आहे.



# गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** संविधान युवा मंच वैजापूर तर्फे वैजापूर तालुक्यातील गरजू विदयार्थ्यांना नुकतेच शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 132 व्या जयंती निमित्त संविधान युवा मंच वैजापूर यांच्या वतीने एक वही एक पेन अभियान राबविण्यात आले होते यावेळी संकलीत करण्यात आलेले वहीपेन दि.4 जुलै रोजी शहरातील मदर तेरेसा वसतिगृह येथे वाटप करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैजापूर चे माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेशभाऊ परदेशी,माजी उपनगराध्यक्ष अकील शेख तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपनिरीक्षक विजय नरवाडे यांची उपस्थिती होती.या प्रसंगी नगरसेवक दिनेश राजपूत,नगरसेवक शैलेश चव्हाण,वैजापूर कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक प्रशांत त्रिभुवन,काँग्रेस चे अनुसूचित जाती जमाती तालुकाध्यक्ष साहेबराव पडवळ, प्रा.आबासाहेब कसबे,समता परिषदेचे पुंडलिक गायकवाड,पंचायत समिती वैजापूर चे संतोष त्रिभुवन,मदर तेरेसा वसतिगृहाचे संचालक अण्णासाहेब ठेंगडे आदींच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संविधान युवा मंच चे अध्यक्ष जीवन पठारे,कार्याध्यक्ष बाळासाहेब त्रिभुवन, सचिव लहानू त्रिभुवन, उपाध्यक्ष राहुल त्रिभुवन,श्रीकांत जाधव, प्रवीण शिंदे, ऋषिकेश त्रिभुवन, अंकुश त्रिभुवन,राहुल त्रिभुवन विशाल त्रिभुवन आदींनी परिश्रम घेतले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. दिनेशभाऊ परदेशीं,काँग्रेस चे साहेबराव पडवळ,कृ. उ. बा. स. Tसंचालक प्रशांत त्रिभुवन, प्रा. कसबे, पोलीस उपनिरीक्षक विजय नलवाडे आदी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.



# वैजापूर तालुक्यात ढगफुटीसदृश पाऊस!!

## शिऊरसह संजरपूरवाडी, बोरसर, करंजगावात जोरदार हजेरी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तब्बल महिनाभराच्या मोठ्या विश्रांतीनंतर वैजापूर तालुक्यात पावसाने हजेरी लावली असून 4 जुलै मंगळवारी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास तालुक्यातील शिऊरसह संजरपूरवाडी, करजंगाव व बोरसर येथे ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्यामुळे मोठी दाणादाण उडाली. पावसामुळे शेतातील पिकांसह जमिनी वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. सायंकाळी सुरू झालेला पाऊस रात्रीही सुरूच होता. तसेच बुधवारी सुद्धा पावसाचा जोर वैजापूरमध्ये सुरूच होता. यावेळी जून महिन्यात वैजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांवर वरूणराजाने अवकृपा केली. त्यामुळे तालुक्यातील खरिप पेरण्या खोळंबून आहे. काही ठिकाणी काही प्रमाणात पेरण्या झाल्या कारण जून महिन्यात शेवटी शेवटी हलक्या स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावली होती. मंगळवारी झालेला हा ख-या अर्थाने पहिलाच पाऊस म्हणावा लागेल. मंगळवारी सायंकाळी तालुक्यातील अनेक भागात मोठ्या पावसाने हजेरी लावली आहे. या पावसामुळे काही भागातील कोवळ्या पिकांना मोठा फटका बसणार आहे. दरम्यान तालुक्यातील संजरपूरवाडी, करजंगाव येथे तब्बल एक तास ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्यामुळे जिकडे तिकडे पाणीच पाणी झाल्याचे चित्र बघायला मिळाले. तर बोरसर येथे बोर नदीचे पाणी जनावरांच्या गोठ्यात पाणी शिरल्याचे पण चित्र बघायला मिळाले. अनेकांच्या घरात पाणी शिरले होते. काही ठिकाणी पिकेसुद्धा पूर्णपणे पाण्याखाली गेले आहेत. परिसरातील नाले तुडुंब भरून वाहत होते.करंजगांव येथे 126 तर बोरसर येथे 83 मिलिमिटर पावसाची नोंद बघायला मिळाली.




# सुप्रिया सुळेंचा इशारा

आधुनिक केसरी

एक सांगते, बापाच्या आणि आईच्या बाबतीत नाद करायचा नाही. बाकी कुणाबद्दलही बोला, आमच्यावर टीका करायची असेल तर कर, पण बापाचा नाद करायचा नाही, असा इशारा खासदार सुप्रिया सुळे यांनी अजित पवारांना दिला आहे. शरद पवारांच्या वयाबद्दल बोलत अजित पवारांनी केलेल्या टीकेला उत्तर देताना सुप्रिया सुळे यांनी हे प्रत्युत्तर दिले. वय झाल्याने वडीलधाऱ्या मंडळीना थांबायला सांगणाऱ्या पोरांपेक्षा, आम्ही पोरी बऱ्या, अशा शब्दांत त्यांनी अजित पवारांना सुनावले. वांद्रे येथील झालेल्या बैठकीत अजित पवार गटाने शक्तीप्रदर्शन केले. त्यावेळी अजित पवारांनी अनेक गौप्यस्फोट करत शरद पवारांवरही टीकास्त्र सोडले. वय जास्त झाले. 82 झाले , 83 झाले, तुम्ही कधी थांबणार आहात की नाही? तुम्ही आशीर्वाद द्या. तुम्ही शतायुषी व्हा, असे अजित पवार म्हणाले होते. त्या टीकेला प्रत्युत्तर देताना सुप्रिया सुळेंनी अजित पवारांना खडे बोल सुनावले. एक सांगते मी महिला आहे. छोटसे काही बोलले तरी टचकन डोळ्यात पाणी येते . पण जेव्हा संघर्षांची वेळ येते तेव्हा पदर खोचून तीच (महिला) अहिल्या होतो, तीच ताराराणी होते आणि तीच जिजाऊ होते. ही लढाई एका व्यक्ती विरोधात नाही , तर भारतीय जनता पक्षाच्या प्रवृत्तीविरोधात आपला लढा आहे, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. काही वर्षांपूर्वी माझं मन हळवं होतं, पण आता गेल्या चार-पाच वर्षांत ते घट्ट झालंय. ज्यांच्यामुळे हे झालं त्यांना धन्यवाद, असा खोचक टोलाही त्यांनी लगावला. शरद पवारांच्या वयाबद्दल बोलत त्यांना निवृत्त होण्यास सांगणाऱ्या अजित पवारांवर सुप्रिया सुळे यांनी निशाणा साधला. काही लोक, आता वय झाल्याने जेष्ठ नेत्यांनी केवळ आशिर्वाद द्यावेत असा सूर आवळत आहे. पण वय हा फक्त आकडा आहे, जिद्द पाहिजे.रतन टाटा या वयातही काम करतात. वयाची 80 वर्ष उलटल्यानंतरही अमिताभ बच्चन हे जाहिरातीत आणि मोठ्या पडद्यावर दिसतात ना, याचा दाखला सुप्रिया सुळे यांनी दिला. आपल्या वडिलांना म्हणायचे की, तुम्ही घरी बसा आणि आशीर्वाद द्या, असे म्हणणाऱ्या पोरांपेक्षा मुलीच चांगल्या, अशा शब्दांत त्यांनी अजित पवारांना सुनावले. घरावर संकट आले, अडचण आली की मुलीच धावून येतात, असे सूचक वक्तव्य सुप्रिया सुळे यांनी केले.

# जनतेचा पैसा नेत्याच्या हौसा...



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**राजकारण सध्या भ्रष्ट, मलिन, नितीहीन होऊन राजकारणात प्रामाणिक पणा व माणुसकी शिल्लक राहलीच नाही. कार्यकर्ते ज्यांचे संपूर्ण जिवन नेत्याचे गुणगान गाऊन सतरंज्या उचलण्यात गेले त्यांचे नेत्यांची कमाई हजारो करोड रुपये होऊन बसली. राजकीय नेत्यांनी जनतेला लुटून किती पैसे कमावले असतील याचा अंदाज सर्वसामान्य लोकांना व नेत्यांच्या भक्तांना कधीच येणार नाही. नेत्यांमध्ये माणुसकी व प्रामाणिक पणा तर यांनी विकुन खाल्लेला आहे. कोणताही नेता हा सर्वसामान्य माणसाचा नाही. किंवा कोणत्याही नेत्याचे व सर्व सामान्य माणसाचे वैयक्तिक शत्रुत्व नाही तरीही सर्व सामान्य माणसाच्या नजरेतून नेते एवढे उतरले की जनते समोर शब्द कमी पडलेत या नेत्यांना बोलण्यासाठी. राजकीय नेते एवढ्या खालच्या पातळीवर गेले आहेत की सर्वसामान्य मानसाला तेवढ्या खालच्या पातळीवर जाऊन बोलण्याचीही लाज वाटत आहे.**

राजकीय नेत्यांनी बजेट मधील पंचवीस टक्के जरी निधी मंजूर झालेल्या कामासाठी वापरला असता तर आज ईडीच्या भितीने पळायची आणि स्वतः चा बंगला सोडून दुसऱ्याच्या ओसरीत बसण्याची वेळ आली नसते. परंतु निवडून गेल्यावर फक्त स्वतः चेच घर भरणाऱ्या नेत्यांनी कधीच जनतेचा विचार केला नाही. दारुच्या पाण्यावर आणि शे पाचशेच्या नोटेवर कार्यकर्ता आणि मतदार विकत घेऊन आज देशाला भीक माघायची वेळ आली आहे. सर्व सामान्य जनतेचा पैसा मात्र राजकीय नेत्यांच्या हौसा सुरू आहेत आणि सर्व सामान्य जनता शिक्षण, रोजगार आरोग्यापासून दुर्लक्षित होत आहे आणि राजकीय नेत्यांचे मुल मात्र विदेशात सुखा समाधानात उच्च शिक्षण घेत आहेत. सर्व सामान्य लोकांचे मुले धर्म व जातीय दंगली मध्ये एकमेकांची डोकी फोडत आहेत तर नेत्यांची मुले अधिकारी होऊन आमच्याच मानगुटीवर बसत आहेत. दरवर्षी चा लाखो करोडोचे बजेट नेमके खर्च कुठे आणि कसा होते यावर एकही जिगरबाज नेता नाही जो निधी व खर्च जनतेसमोर खंबीर पणे मांडेल व स्वतः च्या प्रामाणिकपणाचे आदर्श उदाहरण लोकांना दाखवेल. जनतेसमोर हिशोब या साठी ठेवला जात नाही कि जनतेची कामे कागदोपत्री होऊन सर्वसामान्य जनतेचा पैसा यांनी पळवलेला असतो. सर्वासमोर लेखाजोखा ठेवला तर पितळ उघडे पडेल म्हणून सर्व गप्प बसतात. आणि भाऊ, दादा, अण्णा, काका, नाना यांच्या वर काही बोलले की भक्तांना राग येतो. राजकारण किती ही खालच्या पातळीवर गेले तरीही माणसाने माणुसकी सोडून माणूस म्हणून निच पातळीवर जाऊ नये असे संस्कार प्रत्येकाच्या घरून मिळतात. कोणी काटा काढला तर त्याची जाणीव ठेवावी ही आमची संस्कृती आहे. येथे जनता निवडून आणते आणि निवडून आल्या नंतर जनतेला लात मारली जाते हे संस्कार आहेत तरी कोणाचे? गावामध्ये कोणाचा मृत्यू झाला तर कमीत कमी त्या मृतावर अत्यंसंस्कार होईपर्यंत का होईना संपुर्ण गाव सुतक पाळून मृत कुटुंबाच्या दुःखात सहभागी होतात. परंतु राजकारणात जनतेचा लुटलेला पैसा टिकवण्यासाठी राजकारणाला तर गलिच्छ केले परंतु माणुस म्हणूनही राजकीय नेते गलिच्छ व नितीहीन झाले. बुलढाणा जिल्ह्यात खाजगी बस अपघातात सव्वीस लोकांचा होरपळून मृत्यू झाला. संपूर्ण महाराष्ट्र सदर अपघाता बाबत दुःख व्यक्त करत होता. मृतांची ओळख पटत नव्हती, नातेवाईक मृतदेह ताब्यात घेण्यासाठी व्याकूळ झाले होते. पंचवीस कुटुंब उद्ध्वस्त झाले, अनेकांचे भविष्य जळून खाक झाले. मृतकांच्या कुटुबांचे काय हाल असतील याच विचारात संपूर्ण महाराष्ट्र असताना ज्यांच्या वर जनतेच्या सुरक्षेची व संरक्षणाची जबाबदारी आहे असे आमदार संपूर्ण महाराष्ट्र दुःखात असताना ते मात्र शपथविधी चा उत्सव मोठ्या थाटामाटात करत होते.



राजकारण बाजूला ठेवून एक माणूस म्हणून तरी या नेत्यांनी शपथविधी चा उत्सव योग्य वाटतो का? आमदार हा विधानसभेचा सदस्य असतो आणि विधानसभा हि राज्यातील प्रत्येक व्यक्तीसाठी असते. प्रत्येक लोकप्रतिनिधी हा नैतिक दृष्टीने सार्वजनिक व राज्यातील जनतेचा पालक असतो. स्वतः घरातील पंचवीस लोक जळून खाक झाले आणि हे लोक शपथविधी मध्ये व्यस्त झाले तर यांची माणुसकी, नैतिकता संस्कार नेमके होते कुठे? जर माणुसकी, नैतिकता आणि संस्कारच नसतील तर कोणत्याही नागरिकांना असा विकास नकोच आहे. समृद्धी महामार्ग हा सुरवाती पासून कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे वादग्रस्त आहे. समृद्धी मध्ये भ्रष्टाचार प्रंचड प्रमाणात, डांबर ऐवजी सिमेंट, रस्त्यावर कोणत्याही प्रकारची सुविधा नाही, सर्वात महाग टोल भरून माणसाने मृत्यू विकत घेणे म्हणजे समृद्धी मार्ग होय. समृद्धी महामार्ग हा देशाच्या विकासासाठी नाही तर राजकीय नेत्यांच्या कामचुकार, नियोजनशून्य, आणि भ्रष्टाचाराचा मार्ग आहे. जर यामध्ये भ्रष्टाचार झाला नसता तर समृद्धी चे काम खाजगी कंपनीने केलेले आहे. जे काही दोष महामार्गावर आहेत ते दुर करण्याचे काम खाजगी कंपनीचे आहे. परंतु सरकार खाजगी कंपनीला काहीच न बोलत नाही. याचाच अर्थ त्यामध्ये भ्रष्टाचार आहे. केवळ जाहीराती साठी केलेले काम कधीच यशस्वी होत नाही. म्हणून आपण मागिल नऊ वर्षातील जाहिराती साठी केलेल्या कामे बघितले तर सर्व कामे निकृष्ट दर्जाचे आहेत. जनतेचा पैसा खर्च झाला परंतु कामे योग्य झाले नाही. यामधुन राजकीय नेत्यांनी करोडो रुपयांची कमाई करून घेतली. समृद्धी महामार्गा व्यतीरीक्त अजून काही कामे सरकारने केले व त्याची जाहिरात करून जाहीराती वर करोडो रुपये खर्च केले असे काही काम पाहिले तर तेही काम अयशस्वी झाले आहेत. विदेशातून चित्ते विशेष विमानातून आणले सर्वत्र जाहिराती केल्या आणि आज किती चित्ते शिल्लक राहीले? हजारो करोडो रुपये खर्च करून चित्तेही शिल्लक राहीले नाही तर खर्च झालेल्या पैशाचे काय? हजारो करोडो रुपये खर्च करून महाकाल मुर्ती बसवल्या आणि महाकाल मुर्ती एकाच पावसात कोसळून पडल्या. म्हणजे यांनी देवाला पण सोडले नाही. देवामध्येही भ्रष्टाचार केला. हजारो करोडो रुपये खर्च करून पुल बांधले आणि करोडो रूपयाचे पुल क्षणात पाण्यात पडले. हजारो करोडो रुपये खर्च करून वंदे भारत रेल्वे सुरू केली. एका ठिकाणी झेंडा दाखवण्याच्या कार्यक्रमाचा खर्च जवळपास तिस कोटी रुपये. रेल्वेचा बनवण्याचा खर्च वेगळाच. त्या वंदे भारत रेल्वेसमोर सांड आल्याने इंजन खराब होते, वंदे भारत रेल्वेला जुन्या रेल्वेचे इंजिन लाऊन रेल्वे चालवली जाते, वंदे भारत रेल्वे मध्ये पावसाळ्यात धबधबे सुविधा देऊन मनसोक्त भिजण्याचा आनंद घेता येतो. वंदे भारत रेल्वे मध्ये जेवणही निकृष्ठ पद्धतीने देऊन प्रवाशांच्या जिवाशी खेळले जाते. सांगायचे काय जनतेचा हजारो करोडो रुपये पैसा खर्च होऊन थर्ड क्लास कामे करून जनतेच्या च जिवाशी खेळले जाते म्हणजे जनतेने च वेगवेगळ्या करातून पैसे द्यायचे व मरण विकत घ्यायचे. आणि नेत्यांची हजारो करोडो रुपयांची संपती वाढत जाते तरीही कोणी बोलायला सुद्धा तयार होत नाही. महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान सोहळ्यामध्ये शेकडो लोकांचा मृत्यू, ओडिसा रेल्वे अपघातात हजारो प्रवाश्यांचा मृत्यू झाला. मृतदेह नेत्यासाठी रुग्णवाहिका कमी पडत होत्या तर मालवाहू चारचाकी वाहणामध्ये मृतदेह कोणत्याही कपड्या शिवाय एकावर एक पोते नेल्यासारखे भरून नेले. अजूनही अनेक उदाहरणे आहेत ज्यामुळे जनतेला जिव गमवावा लागला, देशातील जनतेच्या पैशाचा भ्रष्टाचार करून राजकीय नेते मात्र ऐशोआरामाचे जिवन जगत आहेत. दहा वर्षात हजारो ठिकाणी लाखों लोकांचा मृत्यू झाला परंतु सरकार जबाबदारी घ्यायला तयार नाही तर नेमके सरकारचे काम आहे तरी काय? जनतेला लुटून जनतेच्या जिवाशी खेळून हजारो करोडो रूपये भ्रष्टाचाराच्या माध्यमातून कमावणारे नेते मौज मस्ती करतात व सर्वसामान्य जनता मात्र समस्या ग्रस्त तर आहेच शिवाय शिक्षण, रोजगार व आरोग्य सुविधा दुर नेऊन ठेवल्याने माणसाने जगायचे कसे हाच प्रश्न जनतेसमोर आहे. देशामध्ये जनतेचाच पैसा असुन जनताच महागाई मध्ये होरपळत आहे तर नेते मात्र विदेशी वाऱ्या करून हवा पालट करून येत आहेत. राजकारण व राजकीय नेते एवढ्या खालच्या पातळीवर गेले की सर्व सामान्य जनतेला आमचा नेता कोणता हे सांगायचीही लाज वाटत आहे. जनतेच्या मताची किंमत शुन्य करून जनतेला राजकीय लोक काहीच समजत नाही आहेत. म्हणून जनतेचा लाखों करोडो रूपये खर्च होऊनही जनताच त्रस्त आणि राजकीय नेते मस्त आहेत. लोकांनी जागृत होऊन ईव्हीएम विरोध केला तरच लोकशाही वाचवू शकतो अन्यथा भविष्य अंधकारमय आहे.

# परतवारी : जातो माघारी पंढरीनाथा



डॉ. नीता पांढरीपांडे
संपर्क क्र. 7659064555

आधुनिक केसरी

**अठरा दिवसांचा प्रदीर्घ प्रवास करून पदयात्रा संपवून पंढरपुरात आषाढी एकादशीचा सोहळाटाळ मृदुंगाच्या नादात नुकताच संपन्न झाला. साऱ्या चिंता, व्यथा आणि अभावग्रस्त जीवनाचा विसर पडून हे दिवस एका अलौकिक आनंदात घालवून पुन्हा जीवनाला सामोरे जाण्यासाठी नव्या उत्साहाने परत जाणारा वारकरी ज्ञानदेव नामदेवांचे स्मरण करीत माघारी गेला. शेतकऱ्यांना परतीची ओढ लागली आणि लाखो वारकरी वेगाने आपापल्या गावी परतले. अवघ्या महाराष्ट्रातून विविध संतांच्या पालख्या घेऊन पंढरपूरला आलेल्या लाखो भक्तांची दाटी आषाढी एकादशी नंतर दुसऱ्या दिवशी सरली आहे. अनेक वारकरी आषाढीएकादशीच्या दिवशी विठ्ठलाचे दर्शन झाले की दुसऱ्या दिवशी म्हणजेच द्वादशीच्या दिवशी उपवास सोडतात आणि नंतर शिळ्या विठोबाचे दर्शन घेऊन आपापल्या गावी रवाना होता.**

पंढरीहून आळंदीच्या परतीच्या प्रवासाला परतवारी म्हणतात. आषाढी एकादशीला ही वारी संपत नाही. अनेक लोकांना हे माहीत नाहीय. ही वारी गुरुपौर्णिमेपर्यंतचालते.आषाढी एकादशीपासून गुरुपौर्णिमेपर्यंतचे चार-पाच दिवस आणि यानंतरचे दहा दिवस मानवी जीवन समृद्ध करणारे आहेत हे वारीचे उत्तरंग आहे.अत्यंतनिष्ठावंत असणारे देहू, आळंदीहून आलेलेअनुयायी गुरूपौर्णिमा झाल्यावर ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुका घेऊन माघारी जातात. परतीचीवारीम्हणजे वैराग्याची, संतांच्या जवळ नेणारीवारीअसे समजतात.

गुरुपौर्णिमेच्या दिवशी पंढरपूरच्या वाळवंटात संत मंडळी एकत्र येतात काला होतो. काल्याचा प्रसाद घेऊन सर्व वारकरी एकमेकांना नमस्कार करतात आणि नंतर काल्याचा सोहळा संपन्न होतो. त्याबरोबरच वारीचा समारोप होतो. ' तुका म्हणे काला, कोठे अभेद देखीलाहोता / पंढरीसी घडे गळा, पाझर रोकडे/' अर्थात कितीही पाषाण हृदयी, कठोर माणूस असला तरीही तो वारीत सहभागी झाला, वारी बरोबर तनमनाने एकरूप झाला तर पंढरपूर सोडताना त्याच्या डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहणार नाही.

आषाढी एकादशीसाठी जाणाऱ्या वारीचे दर्शन घेण्यासाठी लोकांची झुंबड असते. लाखो लोक वारीत सामील झालेले असतात.पंढरीला जातानाचाहा प्रवास अठरा ते वीस दिवसांचा असतो, पण परत जाताना मात्रवारकरी हा प्रवास दहा दिवसात पूर्ण करतात. पहाटे दोन वाजता उठून ही वारकरी मंडळी परतीच्या मार्गाला लागतात. संध्याकाळी सहा पर्यंत अव्यहत तीस-पस्तीस किलोमीटरचा प्रवास एका दिवसात पूर्ण करतात. परत वारीत मात्र मोजके लोक असतात. हा प्रवास कमी दिवसाचा असतो.

परतीच्या वारीतील बहुतेक मुक्कामाची ठिकाणं हे स्मशानाजवळ आहेत. याचे कारण असे सांगितले जाते की ज्या अतृप्त आत्म्यांना मुक्ती मिळाली नसेल त्यांना ज्ञानेश्वर माऊली, तुकाराम महाराजांच्या सहवासाने मुक्ती मिळेल. बुद्धिवंतांचे मन या गोष्टी जरी सहज स्वीकारू शकत नाही कारण त्यांच्या विचारापलीकडील या गोष्टी आहेत तरीही श्रद्धावंत मात्र या गोष्टी मानतात हे तेवढेच खरे आहे. वारकरी कोणासमोरही हात पसरत नाहीत. सामान्य माणसे कोणताही देखावा न करता वारकऱ्यांची जेवण्याची व्यवस्था करतात. अनेकसंघटना वर्गणी गोळा करून परतणाऱ्यावारकऱ्यांची



जेवण्या-खाण्याचीसोयकरतात, तेंव्हा या सामान्य माणसांमधील सात्विकता बघून आजही माणुसकी जिवंत आहे याचा प्रत्यय येतो. अंगभूत माणुसकी असलेली असंख्य लोक यांना भेटतात तेंव्हा खरोखरच माणसाचा जगण्यावरचा विश्वास वाढतो. कोणतीही आशा अपेक्षा न बाळगता मनातील ईश्वरावरील भक्ती भावाने ही मंडळी जात-पात धर्मापलीकडे जाऊन मदतीचा हात पुढे करतात तेंव्हा मन थक्क होते. गुरुपौर्णिमेला पंढरपुराहून निघणारी ही परतवारी वद्य एकादशीला आळंदीला पोहोचते. हा परतीचा मार्ग वेगळा, अतिशय कठीण आणि खडतर असतो. पावसाने कमालीचा जोर धरलेला, रस्त्यांची दैन्यवस्था, दिवस कमी आणि जास्त अंतर चालायचे या अनेक अडचणीतून माऊलीला पुन्हा आळंदीला सुखरूप घेऊन यायचे काम काही संतमंडळी करतात.

पंढरीला जाताना लाखो वारकरी रथ, पालख्या, घोडे, रिंगण, फुगड्या, कीर्तने, प्रवचने, ठिकठिकाणी औक्षण, पादुका स्नान असे असते. परत येताना मात्र यातील काहीही नसते. ऐश्वर्याकडून वैराग्याकडे नेणारीहीपरतवारी .वारकऱ्यांच्या ऐहिक दारिद्र्यापेक्षा आध्यात्मिक श्रीमंतीकडे आकर्षित करणारी.

माणसाच्या स्वभावाचे अनेक रंग- ढंगाचा अनुभव घेत, अनेक गावातून पडाव टाकीतहीपरतवारी पुढे-पुढे मार्गक्रमित असते. आळंदी देहूमध्ये संतांच्या वाऱ्या परत आल्या की गावकरी त्यांचे स्वागत करतात. देवाच्या समोर सेवा समर्पित करतात. नंतर नारळ व प्रसादाचे वाटप होते. देव मंदिरात येऊन विसावतात आणि मग खऱ्या अर्थाने वारीचा समारोप होतो. पूर्ण झालेलीही परतवारी पूर्णत्वाचा आनंद देऊन जाते आणि पुढील वारीसाठी आत्मिक बळ प्रदान करते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# वैजापूर तालुक्यासाठी १११ कोटींची मिळणार मदत; शेतकऱ्यांना दिलासा

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** गेल्या वर्षी सततच्या पावसामुळे ( अतिवृष्टीच्या निकषाबाहेरील ) वैजापूर तालुक्यातील 82 हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर राज्यातील शेतकऱ्यांच्या मदतीसाठी १ हजार ५०० कोटी रुपयांची मदत २० जून रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आली आहे. त्यामध्ये वैजापूर तालुक्यात ८२ हजार २६२ हेक्टरवरील हेक्टरवरील पिकांचे नुकसान झालेल्या तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी १११ कोटी ८७ लाख ६३ हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली असून मदतीची ही रक्कम लवकरच शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग होणार आहे. नुकसानभरपाईची रक्कम मिळणार असल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. गेल्या वर्षी म्हणजेच सन २०२२ मध्ये झालेल्या सततच्या पावसामुळे तालुक्यातील मोठ्या प्रमाणावर पिके भुईसपाट झाली होती. विशेष म्हणजे तालुक्यात अतिवृष्टी झाली नसली तरी मात्र सततच्या पावसामुळे मोठ्या प्रमाणावर पिके नेस्तनाबूत झाली. नुकसानीनंतर महसूल प्रशासनाने बाधित क्षेत्रावरील नुकसानीचे पंचनामे करून वरिष्ठ पातळीवर पाठविण्यात आले. गेल्या वर्षीच्या नुकसानीनंतर मदत लवकर पदरी पडत नसल्याने शेतकऱ्यांचा भ्रमनिरास झाला होता. परंतु याबाबत प्रशासकीय पातळीवर सर्व सोपस्कार पूर्ण झाल्यामुळे शेतकऱ्यांना मदतीचा मार्ग मोकळा झाला आहे. दरम्यान पिकांचे नुकसान झालेल्या राज्यातील शेतकऱ्यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या सुधारित दराने व निकषानुसार १ हजार ५०० कोटी रुपयांचा मदत निधी वितरित करण्यास मंजुरी देण्यात येत असल्याचा शासन निर्णय २० जून रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार सततच्या पावसामुळे तालुक्यात पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी १११ कोटी ८७ लाख ६३ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. गेल्या वर्षीच्या सप्टेंबर व ऑक्टोबर या दोन महिन्यांच्या कालावधीत सततच्या पावसाने तालुक्यातील ८२ हजार २६२ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. संबंधित शेतकऱ्यांसाठी पीक नुकसानीची मदत शासनाकडून मंजूर केली आहे. मंजूर केलेली १११ कोटी ८७ लाख ६३ हजार रूपयांच्या मदतीची रक्कम शासनामार्फत संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येणार आहे. दरम्यान गेल्या वर्षीच्या झालेल्या नुकसानीच्या मदतीची शेतकरी आतुरतेने वाट पाहत आहेत. याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून शेतकऱ्यांना नेहमीच आश्वासन मिळत होते. परंतु आता नुकसानीपोटीची मदत लवकरच शेतकऱ्यांच्या पदरात पडेल. एवढे मात्र नक्की!

**अशी मिळेल शेतकऱ्यांना मदत :** राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या सुधारीत दरानुसार व निकषानुसार सतत पावसामुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेपर्यंत मदत दिली जाणार आहे . त्यामध्ये जिरायत पिकांच्या नुकसानीसाठी प्रतिहेक्टर ८ हजार ५०० रुपये, बागायत पिकांच्या नुकसानीपोटी प्रतिहेक्टर १७ हजार रुपये आणि बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीपोटी प्रतिहेक्टर २२ हजार ५०० मदत मिळणार आहे .





# माळीवाडा येथे शिवसंपर्क अभियानाची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**दौलताबाद :** शिवसेना संपर्क अभियान अंतर्गत माळीवाडा येथे जिल्हाप्रमुख तनवाणी यांच्या अध्यक्षतेखाली दौलताबाद जिल्हा परिषद गटाच्या शिवसेनेच्या विभाग प्रमुख, शाखाप्रमुख, उपशाखा प्रमुख, वार्ड शाखाप्रमुख व शिवसैनिकांची बैठक घेण्यात आली. बैठकीला शिवसेना जिल्हाप्रमुख तनवाणी यांनी शिवसैनिकांना मार्गदर्शन केले.यावेळी उपजिल्हाप्रमुख बाप्पा दळवी, संभाजीनगर तालुका प्रमुख बाळासाहेब गायकवाड, उपतालुकाप्रमुख विष्णु जाधव, माजी सरपंच जगन्नाथ भगत, विभागप्रमुख नंदकिशोर मुळे, ग्रा.सदस्य मनेश गाजरे, उत्तम अंबारे विभाग प्रमुख ,राम सुराशे विभागप्रमुख, राकेश सक्सेना उपविभाग प्रमुख, भानुदास सांगळे शिवसेना शाखाप्रमुख वंजारवाडी, गजानन मनोरे विभागप्रमुख, शिवनाथ धनायत, अमोल देवतकर, नामदेव धनायत, दत्तात्रय मुळे, संतोष बर्डे, रमेश भगत, गणेश गाजरे, सुरेंद्र जगधणे, कुंदन मोरे, भागिनाथ मोरे, दिगंबर धनवटे, असलम शहा, नदीम शहा बाबासाहेब मस्के, नामदेव जाधव, अविनाश गाणार, मुकेश जाधव, संतोष प्रल्हाद, राजेंद्र जाधव, अविनाश बनसोडे, संदीप ठोकळ, रावसाहेब थंगाले, विशाल समिंदर, राहुल बनसोडे, अविनाश राऊत, अमर वैष्णव, शुभम वैष्णव यांच्यासह शिवसैनिक व परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.






# शाळेत संविधान, शैक्षणिक साहित्य वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** मांडकी, ता.पुरंदर, जि.पुणे येथील सामाजिक कार्यकर्ते व सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्था ( महा. राज्य ) या संस्थेचे सचिव राहुल गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेस भारतीय संविधान भेट आणि अंगणवाडीतील चिमुकल्यांना शैक्षणिक साहित्य पुस्तके, पाटी, पेन्सिलचे बॉक्स वाटप करण्यात आले.राहुल गायकवाड यांनी स्वतःचा वाढदिवस अनावश्यक खर्च टाळून एक आदर्शवादी संविधानिक आणि शैक्षणिक असे कार्य केल्याने त्यांच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले जात आहे. शिवाय असे उपक्रम वारंवार घेण्यात यावेत. शाळांमध्ये संविधान पोहचावे तसेच सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांप्रति शैक्षणिक कार्य घडावे. अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या. शिवाय विद्यार्थी आणि शिक्षकांकडून तसेच मान्यवरांकडून राहुल गायकवाड यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. मांडकी, ता.पुरंदर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस प्रथम भारतीय संविधान भेट देण्यात आले. तसेच विदयार्थ्यांना चॉकलेट वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक सुभाष बोरकर, रवींद्र पवार,मोहन दुर्गाडे, नितीन दुर्गाडे, वासंती दुर्गाडे, पल्लवी भोसले, हेमलता शेटे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष सत्यजित जगताप, सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विशाल धेंडे तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते. अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य आणि खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी अंगणवाडी सेविका गजले मॅडम, समता माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक उत्तम माने,पत्रकार सुशिल गायकवाड, सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विशाल धेंडे,संचालिका रेखा धेंडे, संचालिका प्रज्ञा गायकवाड, रोहित साबळे, अनिकेत साबळे तसेच विद्यार्थी उपस्थित होते.




महाराष्ट्र Business Katta













# आयुष्य फार लहान आहे... जमेल तितका आनंद घ्या

आधुनिक केसरी

**जिंदगी का सफर, है ये कैसा सफर,कोई समझा नही.. कोई जाना नही ह्या सफर चित्रपटातील गीतांच्या ओळी बरंच काही सांगून जातात. "जिंदगी एक सफर है सुहाना यहा कल क्या हो, ये किसने जाना अगदी असंच आयुष्य असतं. आपल्या पुढ्यात नियतीने काय वाढून ठेवले आहे ते कुणीही सांगू शकत नसल्याने आयुष्याचा "गोडवा" माणसाला चाखता यायला हवा. द्वेष, मत्सर, हेवेदावे, कटुता आणि साध्या साध्या कारणावरून नात्यात निर्माण होणारा दुरावा मिटवता आला पाहिजे. जुने जाऊ द्या मरणा लागूनी, गाडूनी अथवा पुरुनी टाका अशी जर वृत्ती असेल तर या जन्मावर, या जगण्यावर माणसाला प्रेम करता येणं शक्य होऊन जातं.आयुष्यात समाधान शोधता येतं. आयुष्य फार लहान आहे, त्यामुळे जमेल तितका आनंद घेता यायला हवा.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

आयुष्य जगायचं की वाट्याला आलं तसंच ते काढायचं हे आपल्या हाती असतं. कुत्रे, जनावरं आयुष्य काटतात आणि माणसं आयुष्य जगतात.पण हल्ली आयुष्य जगणं देखील अनेकांना जमत नाही. पैसा एके पैसा यासाठी देखील सुखाच्या थांब्यावर आयुष्याच्या गाडीला ते कधी विसावा घेऊ देत नाहीत.

हे सगळं आठवण्याचं कारण म्हणजे काल परवा ला बुलडाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा नजीकच्या पिंपळखुटा गावानजीक वैष्णवगडाच्या पायथ्याशी लक्झरीचा अपघात झाला आणि यात स्वतःची काहीही चूक नसतांना, चालकाच्या चुकीमुळे अपघात होऊन २५ प्रवाशांचा आगीत होरपळून अक्षरशः कोळसा झाला. या अपघातात माझ्या संपर्कातील पुण्याच्या रहिवासी राजश्री गांडोळे यांचाही करून अंत झाला.

राजश्रीताई गांडोळे..पती कारंजा घाटगे येथून शिक्षक पदावरून सेवानिवृत्त झालेले. सेवानिवृत्तीनंतर हा परिवार पुण्याला स्थायिक झाला.

हर्बल चा प्रचार प्रसार आणि विक्री करणे, लोकांना वजन घटविणे-वाढविणे बाबत प्रोत्साहित करणे आणि त्यातून आपला व्यवसाय करणे.याच व्यवसायाच्या निमित्ताने त्या मागील महिन्यापासून आर्वी ला गेलेल्या होत्या. आणि आता पुण्याला परत निघाल्या, रात्री 11:46 चे त्यांचे व्हाट्स अप चे लास्ट सिन.

माझे वजन कमी करण्याच्या संबंधाने त्यांच्याशी एक दोन वेळा बोलणे झाले, प्रत्यक्ष भेट कधी झाली नाही.



मात्र माझं व्हाट्स अप स्टेट्स बघणे, माझे आधुनिक केसरी मधील गोडवा हे सदर वाचणे, त्यावर प्रतिक्रिया देणे, वाढदिवसाला आवर्जून शुभेच्छा देणे यातून त्यांच्या विषयी मनात एक आदराचे स्थान व त्यातल्या त्यात त्या आणि मी व्हाट्स अप च्या एका ग्रुपला सोबत असल्याने माझ्या एका ग्रुप मधील सदस्य असलेल्या राजश्रीताई यांचा असा दुर्दैवी शेवट मनाला वेदना देणारा ठरला. त्यांच्या मोबाईल ची टॅग लाईन होती, "Life is very short, enjoy as much as you can" आयुष्य हे फार लहान आहे, जमेल तितका आनंद घ्या. त्यांच्या त्या टॅग लाईन ने आयुष्याच्या प्रवासाकडे वळून बघता आले.

**आसान जिंदगी का सफर नही होता है**
**खुद से बडा कोई हमसफर नही होता है**

# पक्षांतर बंदी कायदा म्हणजे नेमका आहे तरी काय ?



जैनूल आबेद्दीन शेख
संपर्क क्र. 9689683929

आधुनिक केसरी

**एखाद्या सुपर कॉम्पुटरला मागे टाकेल एवढ्या वेगाने राज्यात घडलेल्या नाट्यमय राजकीय घडामोडींमध्ये 'पक्षांतरबंदी कायदा' लागू करावा लागतो, की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. आपापले आमदार फुटू नयेत, म्हणून आमदारांना पंचतारांकित हॉटेलमध्ये ठेवण्यात आले होते. पक्षांतरबंदी कायदा म्हणजे स्वतंत्र कायदा आहे, की आणखी काही हे पाहू या.'आयाराम गयाराम' ही उपाधी पक्षांतर करणाऱ्या आमदार-खासदारांसाठी नेहमी वापरली जाते.**

याचा उदय झाला तो हरियाणामधील पतौडी विधानसभा क्षेत्रामधील गयालाल या आमदारामुळे. हे महाशय त्यांची राजकीय निष्ठा बदलण्यासाठी प्रसिद्ध होते. त्यांनी अनेकदा पक्ष बदलले. एकदा तर त्यांनी दिवसात ३ वेळा पक्ष बदलले आणि 'आयाराम गयाराम' उपाधी प्रचलित झाली. मात्र, अशा प्रकारचे राजकारण नवीन नाही. आपल्या वैयक्तिक आकांक्षांसाठी आपण ज्या पक्षाच्या तिकिटावर निवडून आलो, त्याला तिलांजली देऊन दुसऱ्या पक्षात प्रवेश करण्याचे प्रकार पूर्वीपासून चालत आले आहे. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी सरकारने एका समितीची स्थापन केली आणि समितीच्या शिफारशीप्रमाणे सर्व पक्षांच्या एकमताने १९८५मध्ये ५२वी घटनादुरुस्ती केली गेली. याद्वारे घटनेत १०व्या परिशिष्टाचा समावेश केला गेला. त्या अनुषंगाने कलम १०२ आणि १९१ या आमदार-खासदारांना अपात्र ठरविणाऱ्या अनुच्छेदांमध्येदेखील बदल केला गेला. या सर्व तरतुदींना 'अँटी-डिफेक्शन कायदा' किंवा 'पक्षांतरबंदी कायदा' म्हणून ओळखले जाते.

हा कायदा राजकीय पक्षांसाठी 'नेसेसरी एव्हिल' आहे. आवडला नाही, तरी वेळेला या कायद्याचा आधार घ्यावा लागतो. या तरतुदी संसेदच्या दोन्ही सभागृहांना; तसेच राज्यामधील विधानसभा आणि विधानपरिषद यांना लागू होतात. या सर्व प्रकरणांमध्ये सभापतींना सर्वाधिकार दिलेले आहेत. यातील तरतुदींप्रमाणे कुठल्याही राजकीय पक्षाच्या सदस्याने स्वतःहून त्याच्या पक्षाला सोडचिठ्ठी दिली किंवा पक्षाची १५ दिवस आधी रीतसर पूर्वपरवानगी न घेता पक्षाच्या आदेशाविरुद्ध (पॉलिटिकल व्हिप) मतदान केले किंवा केले नाही किंवा स्वतंत्र उमेदवाराने दुसऱ्या पक्षात प्रवेश केला किंवा नामनिर्देशित सभासदाने सभासद झाल्यापासून ६ महिन्यांच्या आत दुसऱ्या पक्षात प्रवेश केला, तर अशा सभासदाचे सभासदत्व रद्द होऊ शकते. मात्र, या तरतुदींना अपवाद आहेत. त्यातदेखील पळवाटा दिसून येतात. एखादा राजकीय पक्ष संपूर्णपणे दुसऱ्या पक्षात विलीन झाला किंवा एखाद्या पक्षातील दोन तृतीयांश आमदार दुसऱ्या पक्षात गेले, तर अशा वेळी पक्षांतर बंदी कायदा लागू होत नाही. त्याचप्रमाणे दुसऱ्या पक्षात होणारे विलीनीकरण मान्य न करता आमचा 'स्वतंत्र गट' असल्याचे अशा सभासदांनी नमूद केल्यासदेखील ही तरतूद लागू होत नाही. अश्या सभासदांचे सभासदत्व रद्द करायचे, की नाही याचा सर्वाधिकार सभापतींना असतो आणि त्यांचा निर्णय अंतिम असतो. त्याचप्रमाणे समजा सभापतींचेच सभासदत्व या तरतुदींप्रमाणे धोक्यात आले, तर त्याचा निर्णय इतर सर्व सभासद घेतात.

ही घटनादुरुस्ती अगदी ती केल्यापासूनच चर्चेत राहिली आहे. १९९२मध्ये 'किहोटो होलोहॉन विरुद्ध झाचिलीहू' या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या ५ सदस्यीय खंडपीठापुढे आव्हान दिले गेले. ३:२ अशा बहुमताने सर्वोच्च न्यायालयाने ही तरतूद वैध ठरविली. मात्र 'सभापतींच्या आदेशाला कोणत्याही कोर्टात आव्हान देता येणार नाही' ही तरतूद मात्र रद्द केली. न्यायालयाने बहुमताने असा निर्णय दिला, की निवडणूक लढविताना एका पक्षाच्या विचारधारेशी बांधिलकी दाखवायची आणि नंतर कुठलाही विधिनिषेध न बाळगता केलेले पक्षांतर हे कायद्याला अभिप्रेत नाही आणि अशा सभासदांचे सभासदत्व रद्द केल्यास ते राष्ट्रहिताचेच ठरेल आणि तसे केल्यास त्यांच्या 'राईट टू स्पीक' या घटनादत्त अधिकाराचेदेखील उल्लंघन होत नाही. मात्र, सभापतींनी किती दिवसांत निर्णय द्यावा, हे न्यायालयाला सांगता येणार नाही. सभापती निर्णय देत नाहीत, तोपर्यंत पक्षांतरास आव्हान देता येणार नाही, असेही न्यायालयाने नमूद केले आहे. त्यामुळे अशा काळात सभापतींची भूमिका खूप महत्त्वाची ठरते. मात्र, अल्पमतामधील न्यायाधीशांनी सदर घटनादुरुस्ती अवैध असल्याचा निर्णय दिला आणि सभापतींना मिळणाऱ्या सर्वाधिकाराचा दुरुपयोग होऊ शकतो, अशी भीतीदेखील व्यक्त केली आहे. आतापर्यंतच्या निकालांवरून राज्यपाल, सभापती यांच्या अधिकारक्षेत्रामध्ये मा. न्यायालय फार हस्तक्षेप करत नाही, असे दिसून येते. यापूर्वी हरियाणा, उत्तर प्रदेश, गोवा, कर्नाटक या राज्यांमध्ये पक्षांतर बंदी कायदा आणण्याची वेळ आली होती. एकंदरीत सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे घोडेबाजाराला कायमचा आळा बसला आहे. या पुढे कुठलीही बहुमताची चाचणी ही गुप्त मतदानाने घेता येणार नाही आणि त्याचे लाइव्ह प्रक्षेपण करणेदेखील बंधनकारक झाले आहे.


# ग्रामीण साहित्य चळवळ: एक ध्यास पर्व

आधुनिक केसरी

**१९७७ नंतर ग्रामीण साहित्य चळवळ मोठ्या जोमाने उभी राहिली. ग्रामीण साहित्य चळवळ ही केवळ साहित्याच्या पातळीवरची चळवळ नव्हती, तर ती एक सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तन घडवू पाहणाऱ्या एका व्यापक विचारांच्या चळवळीची नांदी होती. कोणतीही चळवळ ही अचानक उगम पावत नसते, त्यासाठी कित्येक दशकांची परंपरा, अभावग्रस्तता, समाजातील अस्वस्थता त्यासाठी कारणीभूत असते. ग्रामीण साहित्याची चळवळ ही अशाच अभावग्रस्त भूमिकेतून, जीवनाच्या वेदनेतून, अस्वस्थतेतून एका अपरिहार्यतेतून निर्माण झालेली, एकूणच मराठी माणसाच्या मनावर एक मूलगामी समाज परिवर्तन करण्याच्या दिशेने वाटचाल करणारी वाङ्मयीन चळवळ होती.**

या वांग्मयीन चळवळीमध्ये काम करणारे महत्त्वाचे शिलेदार म्हणून डॉ.आनंद यादव, दत्ता भोसले, भास्कर चंदनशिव, नागनाथ कोत्तापल्ले, चंद्रकुमार नलगे, प्राचार्य रा.र. बोराडे, यांच्या बरोबरच एक समन्वयाची भूमिका घेऊन, या सर्वांमध्ये एक सेतू म्हणून ज्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली, ग्रामीण साहित्य चळवळ पुढे नेण्याचे महत्त्वाचे काम केले, ते ग्रामीण साहित्याचे भाष्यकार, लेखक, समीक्षक प्रा.डॉ.वासुदेव मुलाटे यांचे नाव घेतल्याशिवाय ग्रामीण साहित्य चळवळीला पूर्णत्वच येणार नाही.

डॉ.वासुदेव मुलाटे यांचे ग्रामीण साहित्यातील व चळवळीतील योगदान अत्यंत महत्त्वाचे असून, ग्रामीण माणूस, त्याचे कष्टमय जगणे ,शेतीत राब राब राबूनही नशिबाला आलेले अठरा विश्व दारिद्र्य, व एकूणच बदलते ग्राम वास्तव डॉ.वासुदेव मुलाटे यांच्या साहित्यातून उजागर होते. "ग्रामीण साहित्यात चळवळः एक ध्यास पर्व" हा त्यांचा २०० पृष्ठ संख्या असलेला ग्रंथ नुकताच स्वरूप प्रकाशनाने प्रकाशित केला आहे. एका विशिष्ट ध्यासाने एकत्रित आलेली लेखक मंडळी आणि त्यांनी उभारलेली साहित्य चळवळ व तिची वाटचाल असे या ग्रंथाच्या आशयाचे स्वरूप असून पुस्तकाच्या शीर्षकाची यथार्थता ही यातून दिसून येते.पुस्तकाचे मुखपृष्ठ ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर अतिशय बोलके व लक्षवेधी आहे. ग्रामीण साहित्य चळवळीची सुरुवात, भूमिका, योगदान, घेतलेली शिबिरे, साहित्य संमेलने, त्यातील घटनाक्रम, मानापमान, रुसवे फुगवे, चळवळीची विघटनता, फलश्रुती वाचकांसमोर आणणे हे या ग्रंथाचे मुख्य प्रयोजन आहे. ग्रामीण साहित्य चळवळीच्या योगदानाच्या संदर्भात डॉ.वासुदेव मुलाटे म्हणतात की "ग्रामीण जीवनाच्या व्यथा वेदना, त्यांचे प्रश्न, नित्याचे जगणे, ग्रामीण समाज आणि ग्रामीण संस्कृती, ग्रामीण भाषा, महाराष्ट्राच्या विविध भागात बोलल्या जाणाऱ्या बोली, त्यांचे शब्द सौष्ठव या साऱ्याकडे बघण्याची दृष्टी या चळवळीने निर्माण केली, तिची वाङ्मयाच्या इतिहासात नोंद घ्यायला लावली, तसेच ग्रामीण शब्दकोशाची निर्मिती हे या चळवळीचे योगदान आहे". अजूनही शेतकऱ्यांचे प्रश्न सुटले नाहीत, ग्रामीण माणसाच्या व्यथा वेदना संपल्या नाहीत, अनेक भयावह प्रश्न उभे आहेत याकडे शासनाचे, समाजाचे लक्ष वेधण्याचे काम नव्या प्रतिभावंत लेखकांनी करावे असे ते म्हणतात.आधीच्या पिढीतील लेखकांकडून, व चळवळीकडून राहिलेल्या उणिवा व बलस्थाने लक्षात घेऊन नव्या उमेदीने व जोमाने ही चळवळ उभी राहिली पाहिजे हा आशावाद ते या पुस्तकातून व्यक्त करतात. व याच अंतर्मनाच्या भावनेतून ग्रामीण साहित्य चळवळीतील मंथरलेल्या दिवसांचा लक्षवेधी धांडोळा त्यांनी या ग्रंथात घेतला आहे. ग्रामीण साहित्य चळवळीची सुरुवात, चळवळीचे साकार रूप, चळवळीची उपयोगिता, प्रतिसाद, उत्साह उद्दिष्टांच्या दृष्टीने झालेली वाटचाल व नंतर आलेली शिथिलता, मानापमान या बाबी लेखकाने वास्तव पणे मांडल्या आहेत. सदरील ग्रंथाचे लेखन हे चार प्रकरणात विभागले असून पहिल्या प्रकरणात ग्रामीण साहित्य चळवळीची पार्श्वभूमी सांगितली आहे.ग्रामीण साहित्य चळवळःएक ध्यास पर्व त्या दुसऱ्या प्रकरणातून लेखकाची साहित्यिक जडणघडण, नोकरी व अनुभव १९७७ मध्ये सुरू केलेला ग्रामीण साहित्य मेळावा ते १९९९ पर्यंत घेतलेली साहित्य संमेलने, नवलेखांची शिबिरे, बैठका, चर्चासत्रे याचा नीटपणे आढावा या प्रकरणात घेतला आहे. तिसऱ्या प्रकरणात ग्रामीण साहित्य चळवळीत नव्याने व जुन्या लिहित्या लेखकांनी कसा हातभार लावला आहे हा विचार मांडून दलित साहित्य चळवळ व ग्रामीण साहित्य चळवळ या एकमेकांच्या विरोधातील चळवळी नसून त्या एकमेकांशी परस्पर पूरक आहेत हा समतोल विचार त्यांनी मांडला. चौथ्या प्रकरणात ग्रामीण साहित्य चळवळीच्या सुरुवातीपासून अनेक नवोदित लेखकांना घडवण्याचे, प्रोत्साहित करण्याचे चळवळीची भूमिका समजून सांगण्याचे काम या चळवळीने केले या चळवळीवर अनेक प्रकारे टीका पण झाली.यावर मात करण्याचे काम या चळवळीतील लेखकांनी, कार्यकर्त्यांनी केले. कोणतीही चळवळ नावारूपाला येत असली की, वर्चस्ववाद, हेवे दावे हे आलेच.ही चळवळ ही याला अपवाद राहिली नाही.ग्रामीण साहित्य चळवळीमुळे अनेकांना प्रस्थापित लेखक म्हणून नाव दिले.चळवळीची भूमिका सोडून एखादा लेखक वागत असेल तर चळवळीतील इतरांना ते खटकणारे असते.डॉ.आनंद यादव यांचे समरसता मंचावर जाणे, डाव्या व उजव्या विचारांची सुसंगत सांगड घालने ,हे चळवळीतील परिवर्तनवादी व फुले, शाहू ,आंबेडकरी विचारांनी चालणाऱ्या लेखकांना न पटणारे होते.यातूनच ग्रामीण साहित्य चळवळीतील फुटीची वीजे रोवली गेली. प्रादेशिक समतोलही चळवळीला साधता आला नाही.परिणामी वैचारिक मतभेदातून ही चळवळ थंडावत गेली.या चळवळीपासून प्रेरणा घेऊन नव्याने अनेक ग्रामीण लेखक आजही ग्रामीण वास्तवाला आपल्या साहित्यातून साकारण्याचा प्रयत्न करत आहेत. डॉ.द.त्ता.भोसले यांनी चळवळीची अपरिहार्यता ही थोडक्यात शेवटच्या पृष्ठावर मांडली आहे. ग्रामीण साहित्याचे, व चळवळीचे अभ्यासक, विद्यार्थी, संशोधक यांच्यासाठी हा ग्रंथ महत्त्वाचा आहे.




**प्राचार्य डॉ.रामकिशन दहिफळे,**
**मराठी अभ्यास मंडळ सदस्य,**
**एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई.**

# 'सर्जा'



प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क क्र. 9320441116

आधुनिक केसरी

**कथा कादंबरी कविता ललित प्रवास वर्णन अशा अनेक लेखन प्रवाहातील एक महत्वाचा लेखन प्रवाह म्हणजे कादंबरी! मराठी भाषेतील कादंबऱ्यांनी मराठी साहित्याचा ठेवा समृद्ध केला आहे. कादंबरी हा शब्द भारतात सातव्या शतकात होऊन गेलेल्या बाणभट्ट नामक कवीने लिहिलेल्या 'कादंबरी' या ग्रंथनामावरून आला. तेव्हापासून सुरू झालेली ही लेखन संस्कृती आजता गायत सुरू आहे. काळानुरूप कादंबरी लेखनात योग्य ते बदल होत गेले. म्हणूनच अत्यंत गतिमान झालेल्या आजच्या आयुष्यात देखील खरा वाचक आजही वेळ काढून कादंबरी वाचायला प्राधान्य देतो.**

कादंबरीचा गाभा, त्यातील पात्रे, पात्रांमधील संवाद, त्यांची भाषा ह्या सर्वच प्रणालीमध्ये कादंबरी काळाच्या कसोटीवर सिद्ध ठरत गेली. याचे श्रेय संपूर्णपणे कादंबरीकाराला जाते.


लेखक म्हणून लिहिण्याचे अनेक पर्याय उपलब्ध असताना अनेक पात्र, अनेक संदर्भ असलेली एक दीर्घ कथा कादंबरी स्वरूपात सादर करणे हे लेखकाचे कसब असते.

असेच आपले लेखन नैपुण्य पुन्हा एकदा सिद्ध करत लेखक व्यंकट पाटील आपली ' सर्जा ' ही कादंबरी वाचकांसाठी घेऊन आले आहेत. ज्येष्ठ नाटककार अशोकजी समेळ यांच्या हस्ते प्रकाशित झालेले आणि ज्येष्ठ कवी अशोकजी बागवे यांच्या शुभेच्छा लाभलेले संधिकाल प्रकाशन तर्फे प्रकाशित सर्जा ही कादंबरी नुकतीच वाचकांच्या भेटीला आली आहे. लेखक पाटील यांनी या आधी लिहिलेल्या घात, वारसा आणि यशवंत या तिन्ही कादंबऱ्यांना वाचकांचा भरभरून प्रतिसाद तर मिळालाच आणि त्याचबरोबर अनेक पुरस्कारही मिळाले. आणि म्हणूनच अगदी उत्सुकतेने ' सर्जा ' ही कादंबरी वाचायला घेतली.

कादंबरीचा नायक सर्जा नामक एक तरुण आहे. ग्रामीण पार्श्वभूमीवर ही कथा रंगत जाते.

लेखक पेशाने स्वतः महाराष्ट्र पोलीस विभागात कर्तव्य पालन करणारे प्रामाणिक अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यामुळे आपल्या पोलिस विभागातील ड्युटी बजावताना आलेले माणसांचे अनेक अनुभव, मनुष्य स्वभावाचे अनेक पदर त्याजी जवळून पाहिले. त्यामुळे कादंबरीत त्यांनी सर्जा साकारताना

त्याचा लहानपणापासून ते पुढच्या आयुष्याचा प्रवास, त्यातील रंजक वळणावर घडणाऱ्या अनेक घडामोडी, त्याच्या आयुष्यात येणारी आव्हाने, संकटे आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे धक्का तंत्र वापरून लेखकाने वाचकांसमोर उभा केलेला सर्जा हा वाचकाला एकाच वेळी अचंबित करतो, थक्क करतो आणि खजील ही करतो. सर्जा ही एक सस्पेन्स कादंबरी आहे. विषयाला जागत अगदी शेवट पर्यंत सस्पेन्स कायम ठेवून आधी लिहिले त्या प्रमाणे कादंबरी वाचता वाचता वाचकांना धक्का देऊन संपते.




या शिवाय कादंबरीची ठळक वैशिष्ट्ये सांगायची तर अनेक आहेत,जसे की शब्द रचना, शब्द प्रयोग, वाक्य रचना अगदी खिळवून ठेवणारी, गुंगवून ठेवणारी आहे. उदाहरणार्थ, लेखक लिहितात की ' परशुरामने गोठ्यातून बैलं सोडली, बैलांच्या गळ्यातला घुंगराचा आवाज ऐकून सरिताने सात आठ भाकऱ्या त्यावर उसळ आणि खर्डा टाकला ' बघा.. आताही वाचताना हे दृश्य तुमच्या डोळ्यासमोर आले असेल. लिहिलेले हे वर्णन जणू आता आपल्या समोर घडत आहे असे वाचकाला वाटणे हेच लेखकाचे यश आहे. हैबती, परसू, तात्या, शालन वहिनी, हेमांगी बिराजदार, अवंतिका, तानाजी जाधव, इन्स्पेक्टर शिंदे, हिमांशू, मनोज ही सर्वच पात्रे लेखकाने त्यांच्या भूमिकेला न्याय देत रंगवली आहेत. प्रत्येक पात्राचा सर्जाच्या आयुष्यातील संबंध वाचकांना नीट समजेल असा अधोरेखित केला आहे.

ह्या बाबी आवर्जून अशा साठी नमूद करत आहे कारण कादंबरी लेखनात अनेकदा याबाबतीत लेखकाचा स्वतःचाच गोंधळ उडालेला दिसून येतो. सुरुवातीला कथेत दिसणारी अनेक पात्रे पुढे कादंबरीच्या ओघात अदृश्य होतात. वाचकाला अनेकदा अनेक गोष्टींचा संदर्भच लागत नाही. परंतु सर्जा वाचताना मात्र असा अनुभव येत नाही.

कादंबरीचा विषय आधी सांगितल्या प्रमाणे सस्पेन्स थ्रिलर आहे, त्यामुळे वाचक म्हणून मनात निर्माण होणाऱ्या सर्व शंकांचे निरसन करून त्याला थक्क करवून ही कादंबरी एक विलक्षण वाचनानुभव देते. रिटायर्ड सहायक पोलिस आयुक्त लेखक श्री व्यंकट पाटील यांचे हे पाचवे पुस्तक आहे. आपल्या वैयक्तिक आणि व्यावसायिक, सामाजिक जीवनातील प्रदीर्घ अनुभव घेऊन त्यांनी साहित्य क्षेत्रात केलेले हे पदार्पण वाचकांसाठी कसदार साहित्याचा खजिना उपलब्ध करून देणारे ठरणार आहे यात दुमत नाही. तब्बल 256 पानांचे हे पुस्तक फक्त दिसायलाच भक्कम नाही तर वाचायला ही तृप्त समाधानी असे आहे. म्हणूनच आपण सर्व वाचकांनी ' सर्जा ' नक्की वाचावा.

# वीस हजार अतिदुर्मिळ पुस्तकांचा संग्रह!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**प्राच्यविद्या संशोधक डॉ. रा.ना. दांडेकर यांनी ५४ वर्षे भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या मानद सचिवपदाची धुरा सांभाळली होती. संस्थेच्या डॉ.रा.ना.दांडेकर ग्रंथालयामध्ये भारतीय आणि युरोपियन भाषेतील सव्वा लाख पुस्तकांचा समावेश असून त्यापैकी वीस हजार पुस्तके दुर्मिळ आहेत. प्राकृत शब्दकोश हा महत्त्वपूर्ण प्रकल्प संस्थेने पूर्णत्वास नेण्याकडे वाटचाल केली आहे. केवळ अभ्यास आणि संशोधन या कार्यालाच वाहून घेतलेल्या अभ्यासकांची पिढी घडविण्याचे कार्य संस्थेने केले आहे.**


प्राच्यविद्या म्हणजे भारत आणि पौर्वात्य संस्कृती व समाज यातील गणित, व्याकरण, काव्य, चिकित्सा यांचा अभ्यास होय. काहीवेळा हा शब्द भारतविद्या आणि संस्कृतविद्या अशा अर्थानेही वापरला जातो. तथापि हे सर्व भिन्न आहेत. महाराष्ट्रात ठाणे येथे एक प्राच्यविद्या अभ्यास संस्था आहे. तसेच पुणे येथे भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर कार्यरत आहे. त्याचे संस्थापक डॉ.रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे एक मराठी प्राच्यविद्या अभ्यासक होते. तसेच मधुकर ढवळीकर हेही प्राच्यविद्या संशोधक होते.

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था ही महाराष्ट्रामधील पुणे शहरातील ऐतिहासिक संशोधन संस्था आहे. पुण्यातील भांडारकर रस्ता किंवा विधी महाविद्यालय रस्ता यांवर दि.६ जुलै १९१७ रोजी डॉ.रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या जीवनकार्याचा गौरव म्हणून त्यांच्या नावाने या संस्थेची स्थापना करण्यात आली. ही संस्था भारतातील एक प्रमुख प्राच्यविद्या संस्था असून आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वाची संशोधन संस्था आहे. या संस्थेत अंदाजे सव्वा लाख प्राचीन दुर्मिळ ग्रंथ तसेच एकोणतीस हजार पाचशे दहा हस्तलिखिते जतन करून ठेवण्यात आली आहेत. प्राच्यविद्या संशोधक डॉ. रा.ना. दांडेकर यांनी ५४ वर्षे भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या मानद सचिवपदाची धुरा सांभाळली होती. संस्थेच्या डॉ.रा.ना.दांडेकर ग्रंथालयामध्ये भारतीय आणि युरोपियन भाषेतील सव्वा लाख पुस्तकांचा समावेश असून त्यापैकी वीस हजार पुस्तके दुर्मिळ आहेत. प्राकृत शब्दकोश हा महत्त्वपूर्ण प्रकल्प संस्थेने पूर्णत्वास नेण्याकडे वाटचाल केली आहे. केवळ अभ्यास आणि संशोधन या कार्यालाच वाहून घेतलेल्या अभ्यासकांची पिढी घडविण्याचे कार्य संस्थेने केले आहे. पहिल्या पिढीतील अभ्यासक आणि थोर समाजसेवक डॉ.रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या ऐंशीव्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्या विद्यार्थ्यांनी आणि हितचिंतकांनी भांडारकर संस्थेची स्थापना केली. दि.६ जुलै १९१७ रोजी भांडारकर यांच्या सहस्र चंद्रदर्शनाचा योग साधून संस्था कार्यरत झाली. तत्कालीन मुंबई इलाख्याच्या ताब्यात असलेला हस्तलिखितांचा ठेवा सन १९१८मध्ये संस्थेकडे देणगी म्हणून सोपविण्यात आला. प्राच्यविद्येच्या क्षेत्रात काम करणाऱ्या जगभरातील संशोधकांच्या ज्ञानाची भूक भागविणाऱ्या भांडारकर प्राच्यविद्या संस्थेचा सुवर्णकाळ आता इतिहासबद्ध झाला आहे. या प्राच्यविद्या संशोधन संस्थेमध्येच ग्रंथपाल म्हणून अर्धशतकाहून अधिक काळ काम पाहिलेले वा.ल.मंजुळ हे हा इतिहास लिहीत होते. सन २०१७मध्ये संस्थेच्या शताब्दी महोत्सवापूर्वी हा इतिहास जगासमोर आणण्यासाठी ते प्रयत्नशील होते. प्राच्यविद्यावरील ग्रंथ व पुस्तके- प्राच्यविद्या आणि धर्मपरंपराः प्रकाशक साप्ताहिक विवेक, श्री उम्मेद प्राच्यविद्या ग्रंथमाला, महाराजा मानसिंह पुस्तक प्रकाशन, जोधपूर, विद्याभवन प्राच्यविद्या ग्रंथमाला, चौखंबा विद्याभवन वाराणसी, नृत्यरत्नकोश राजस्थान अशी आहेत. तर काही संस्था व केंद्रे- राजस्थान प्राच्यविद्या प्रतिष्ठान जोधपूर राजस्थान सरकारद्वारा स्थापित प्राच्यविद्या प्रतिष्ठान उदयपूर, दधिची आचार्य प्राच्यविद्या उत्थानसंघ हॉर्वर्ड कॅलिफोर्निया, राजा भर्तृहरी प्राच्यविद्या शोधसंस्थान उज्जैन मध्यप्रदेश, प्राच्यविद्या शोधसंस्थान उज्जैन मध्यप्रदेश, अखिल भारतीय प्राच्यविद्या संस्थान ब्यावर, राजेश्वरी प्राच्यविद्या शोधसंस्थान वाराणसी, बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषद महाराष्ट्र, डॉ.गोस्वामी गिरधारीलाल शास्त्री प्राच्यविद्या प्रतिष्ठान दिल्ली, भोगीलाल लहेरचंद प्राच्यविद्या संस्थान दिल्ली, काशी हिंदू विश्वविद्यालय प्राच्यविद्या विभाग, संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालय प्राच्यविद्या केंद्र ही आहेत.



या भांडारकर प्राच्यविद्या संस्थेमध्ये झालेले संशोधनाचे कार्य, त्यामध्ये आपापला वाटा सक्षमपणे उचललेल्या व्यक्तींचे योगदान नव्या पिढीसमोर यावे, यासाठी हा इतिहास लिहिला गेला आहे. संस्थेच्या स्थापनेसाठी आनंदाश्रमामध्ये झालेली बैठक महत्त्वाची मानली जाते. डॉ.रामकृष्ण भांडारकर, डॉ.नरहर सरदेसाई, डॉ.श्रीपाद बेलवलकर यांचे संस्थेच्या स्थापनेपासूनचे भरीव योगदान म्हणावे लागेल. संस्थेकडील हस्तलिखितांच्या संग्रहामध्ये होत असलेली प्रगती आणि त्याचे जतन करण्यासाठी होणारे प्रयत्न खुप मोलाचे आहेत. संस्थेमध्ये कार्य करणाऱ्या सर्व ज्येष्ठ संशोधकांचे काम आणि त्यांच्याविषयीच्या आठवणींचा या इतिहासामध्ये समावेश गरजेचा आहे. संस्थेत झालेल्या महाभारताची चिकित्सक आवृत्ती, धर्मशास्त्राचा इतिहास, महाभारताची स्वीकृत संहिता, महाभारताची श्लोक सूची, प्राकृत शब्दकोश अशा विविध संशोधन प्रकल्पांच्या कामांची पार्श्वभूमीही या इतिहासामध्ये समाविष्ट केली असल्याचे समजते. हे सर्वंकष मार्गदर्शक पुस्तक सुमारे तीनशे पानांचे आहे, हे विशेष!

# नियम पाळा अपघात टाळा !



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**मुंबई ते नागपूर प्रवासातील अंतर कमी करण्यासाठी तसेच मराठवाडा विदर्भाच्या विकासाला चालना मिळावी यासाठी समृद्धी महामार्ग निर्माण करण्यात आला आहे. पण हाच महामार्ग आता मृत्यूचा मार्ग बनत चालला आहे.**

नागपूरहून पुण्याला येणाऱ्या एका खाजगी ट्रॅव्हल बसला बुलढाणा सिंदखेडराजा दरम्यान भीषण अपघात झाला या अपघातात बसला आग लागली आणि त्या आगीत २५ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना नुकतीच घडली.

या अपघाताने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला. अर्थात समृद्धी महामार्गावरील हा पहिला अपघात नाही गेल्या १०० दिवसात या महामार्गावर तब्बल ९०० अपघात झाले आहेत याचाच अर्थ या महामार्गावर दररोज सरासरी ९ अपघात होतात. या अपघातात आतापर्यंत शेकडो प्रवाशांना आपला जीव गमवावा लागला आहे तर हजारो प्रवासी जखमी झाले आहेत. समृद्धी महामार्गावरील वाढते वाहन अपघात चिंताजनकच आहे. कोणतेही टोकदार वळण किंवा अडथळा नसलेला हा विस्तीर्ण आणि चकचकीत असलेला हा महामार्ग आहे तरीही त्याच्यावर इतके अपघात कसे होतात याचे आश्चर्य वाटते. केवळ समृद्धी महामार्गावरच नाही तर देशातील सर्वच महामार्गावर आणि रस्त्यांवर दररोज अपघात होतच असतात या रस्ते अपघातात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो. देशात सर्वात जास्त मृत्यू अपघातात होतात. अपघातात जखमी आणि कायमचे जायबंदी होणाऱ्यांची संख्या तर अगणित आहे. विशेष म्हणजे यात तरुणांचा समावेश अधिक आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत त्याच तरुणांचे अपघातात निधन होत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. अनेक प्रयत्न करूनही देशातील रस्ते अपघातांची संख्या का कमी होत नाही हा संशोधनाचा विषय आहे.



वाढत्या रस्ते अपघातांना जितकी व्यवस्था जबाबदार आहेत तितकीच मानवी चुकाही जबाबदार आहेत. टोलच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची वसुली केली जात असतानाच महामार्गावर जीवघेण्या ब्लॅकस्पॉट मध्ये सुधारणा होत नाही. त्याचप्रमाणे रस्त्यांवरील खड्डे, धुळीचे साम्राज्य, महामार्गावरील अतिक्रमणे, सर्व्हिस रोडचा अभाव, रस्त्यावरच उभी केली जाणारी अवजड वाहने, बंद पडलेल्या वाहनांसाठी कमी पडत असलेली मदत केंद्रे, मोकाट जनावरे, अपुरे दुभाजक याबाबी अपघातांसाठी कारणीभूत ठरत आहेत. महामार्गावर वाहन चालकांकडून वेग मर्यादा पाळण्यात येत नाही. बहुतेक प्रवासी १०० किमी पेक्षा अधिक वेगाने वाहने चालवतात. ट्रक व इतर मोठ्या वाहनांकडून लेनची शिस्त पाळली जात नाही. काही वाहन चालक तर दारु पिऊन वाहने चालवतात तर काही वाहन चालक वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलतात. वाहनांची व्यवस्थित निगा न राखणे, सीट बेल्ट न लावणे या गोष्टीही अपघातास कारणीभूत ठरतात. नियम माहीत असूनही चालक त्यांचे पालन करत नाहीत. सगळ्यांनाच कमी वेळात आपले ठिकाण गाठायचे असते. नियमांचे पालन न केल्यानेच अपघातांची संख्या कमी होत नाही. अपघातांची संख्या कमी करायची असेल तर वाहन चालकांना नियमांचे पालन करावेच लागेल. नियम पाळा अपघात टाळा!

# कंजूस माणूस

आधुनिक केसरी

एकदा एक कवी श्रीमंत माणसाकडे गेला. तिथे त्याने आपल्या सर्व कविता गावून दाखविल्या आणि आशा केली की तो श्रीमंत माणूस आपल्याला काहीतरी उत्तम बक्षिस देईल. परंतु तो श्रीमंत माणूस 'अतिशय कंजूस' होता तो म्हणाला, 'माझ्या प्रिय कवीमित्रा, मी तुझ्या कविता ऐकून खुश झालो आहे. तू उदया परत ये, मी तुला खुश करून टाकेल.'

उदया मला नक्कीच काहीतरी चांगले बक्षिस मिळेल, या आशेने कवी आनंदाने घरी गेला.

दुसऱ्या दिवशी, ठरलेल्या वेळेत न चुकता तो त्या श्रीमंत माणसाच्या घरी गेला. तो श्रीमंत माणूस बोलला, 'सन्माननिय कवीराज, तू मला तुझ्या कवीता पठण करून दाखविल्या व खुश केले, मी पण तुला आज माझ्या घरी बोलवून खुश केले आहे.' प्रत्यक्षात तू मला काहीही दिलेले नाही, त्याचप्रमाणे तुलासुध्दा काहीच मिळणार नाही. आता, आपला व्यवहार संपला आहे.

तो कवी खूप निराश झाला. त्याने घडलेला सर्व प्रकार त्याच्या जवळच्या मित्राला सांगितला. त्याच्या मित्राने ही सर्व हकिगत बिरबलकडे कथन केली. हे सर्व ऐकून बिरबल बोलला, 'मी सांगतो तसे कर, तू त्या श्रीमंत माणसाकडे जा आणि त्याला घरी जेवणाचे आमंत्रण दे तसेच तुझ्या कवी मित्राला पण बोलव. अर्थातच, मी पण तिथे असेल.

काही दिवसानंतर बिरबलने ठरविलेल्या योजनेप्रमाणे जेवणाचा कार्यक्रम ठरला. आधी ठरल्याप्रमाणे तो श्रीमंत माणूस जेवणाच्या कार्यक्रमाला वेळेवर पोचला. तेव्हा बिरबल कवी व अन्य मित्र एकमेकांबरोबर बोलत होते.

वेळ जात होती तरीपण जेवण वाढले गेले नाही सर्व पाहुणे एकमेकांत गप्पा मारण्यात व्यस्त होते. शेवटी त्या श्रीमंत माणसाचा संयम सुटला व तो बोलला, 'जेवणाची वेळ निघून गेली आहे, आपण येथे जेवण्यासाठी आलेलो नाही का ?'

जेवण ? कसले जेवण ?' बिरबल बोलला. श्रीमंत माणूस रागात बोलला 'आपण हे काय बोलत आहात, कसले जेवण ? आपण येथे जेवणासाठीच एकत्र जमलो आहोत ना ?' बिरबल बोलला 'आपणास जेवणाचे असे काही आग्रहाचे आमंत्रण नव्हते, असे सांगितले गेले होते की जेवणाला या.' तो श्रीमंत माणूस नाराज झाला आणि रागात बोलला 'हे काय आहे ?' माझ्यासारख्या एका सभ्य माणसाबरोबर लबाडी केली आहे व मला फसविले आहे.

बिरबल हसायला लागला आणि बोलला, 'मी अस कधी बोललो की ही वर्तणुक योग्य आहे.' परंतु तू या कवीबरोबर सुध्दा लबाडी केली आहे 'उदया ये म्हणून!' मी पण आपल्याला फक्त खुश करण्यासाठी बोललो कृपया तू पण जेवायला ये. त्या श्रीमंत माणसाला त्याच्या चुकिची जाणीव झाली आणि घरी जाऊन त्याने त्या कवीला योग्य ते बक्षिस दिले व त्याचा सन्मान केला.

# या नेत्यांची नि:पक्ष चौकशी होणार ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**२ जुलै २०२३ रोजी अजित पवारांसह राष्ट्रवादी काँग्रेसच्या ९ आमदारांनी शिंदे-फडणवीस सरकारमध्ये मंत्रिपदाची शपथ घेतली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या या नेत्यांवर याआधी भाजपकडून भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप करण्यात आले होते, तर काहींच्या मागे तपास यंत्रणांचा ससेमिराही सुरु होता. आता या नेत्यांची निःपक्ष चौकशी होणार का? हा प्रश्न आता जन सामान्यांना पडला आहे. २जुलै २०२३ रोजी झालेल्या शपथविधीनंतर अजित पवार हे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री झाले. पण अजित पवारांवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप भाजपकडून याआधी करण्यात आलेले होते. तसंच, साखर कारखान्यांशी संबंधित प्रकरणांत ईडी त्यांच्याजवळ येऊन ठेपली होती.**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नातेवाईकांच्या घरी आयकर विभागाने मार्च २०२२ मध्ये छापेमारी केली. यात काही संपत्तीवर आयकर विभागाने जप्तीची कारवाई केल्याची माहिती समोर आली होती.

अजित पवारांशी संबंधित जरंडेश्वर साखर कारखान्यावर जप्तीची कारवाई करण्यात आली होती.

३ जुलै २०२३ भाजप नेते नेते किरीट सोमय्या यांनी याप्रकरणी आरोप केले होते. अजित पवार यांची आर्थिक उलाढाल आश्चर्यकारक आहे, असं सोमय्या म्हणाले होते. बिल्डरांकडून त्यांच्या आणि त्यांच्या नातेवाईकांच्या खात्यात शंभर कोटींहून अधिकची अपारदर्शक बेनामी संपत्ती असल्याचा आरोप किरीट सोमय्या यांनी केला होता.राज्याच्या भ्रष्टाचारविरोधी पथकाने सिंचन घोटाळ्याप्रकरणी अजित पवारांना क्लिन चीट दिली होती. पण अंमलबजावणी संचलनालयाने मे २०२३ विदर्भ सिंचन घोटाळ्याप्रकरणी पुन्हा नव्याने चौकशी सुरू केली होती.तसंच, आयकर विभागाने अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीवर छापेमारी केली होती. दरम्यान, अजित पवार यांच्या नातेवाईकांवरील या छापेमारेतून आयकर विभागाने १८४ कोटी रुपयांची बेनामी आर्थिक व्यवहार झाल्याचा दावा केला होता. मात्र, एप्रिल २०२३मध्ये टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्राने दिलेल्या बातमीनुसार, ईडीने राज्य सहकारी बँक घोटाळ्याच्या संदर्भात अजित पवार आणि सुनेत्रा पवार यांच्याशी संबंधित एका कंपनीविरोधात चार्जशिट दाखल केली. पण त्यामध्ये अजित पवार आणि सुनेत्रा पवारांचं नाव मात्र घेण्यात आलं नव्हतं.

यानंतरच राष्ट्रवादीतल्या बंडाची चर्चा सुरु झाली होती. या बातमीवर अजित पवार यांनी पुढे येऊन स्पष्टीकरणही दिलं होतं. २०१४मध्ये सत्तांतर झाल्यानंतर भुजबळांभोवतीचा फास आवळला जाऊ लागला. त्यांना मार्च २०१६ मध्ये दिल्लीतल्या महाराष्ट्र सदन प्रकरणी आणि बेहिशेबी मालमत्ता गोळा केल्याच्या आरोपांवरून अटक झाली. त्यांची रवानगी मुंबईतल्या आर्थर रोड तुरुंगात करण्यात आली. अनेकवेळा प्रयत्न करूनही त्यांना पुढची दोन वर्षं जामीन मिळाला नाही.

मात्र, सप्टेंबर २०२१ मध्ये महाराष्ट्र सदनाच्या कथित गैरव्यवहार प्रकरणी छगन भुजबळ यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. मुंबई सत्र न्यायालयाने भुजबळ यांच्यासह ६ आरोपींना दोषमुक्त केलं. भुजबळ आणि त्यांच्या कुटुंबियांविरोधात महाराष्ट्र सदन कथित गैरव्यवहार प्रकरणी पुरावे असल्याचा एसीबीचा दावा होता.मात्र, याव्यतिरिक्त छगन भुजबळ यांच्यावर आणि त्यांच्याशी संबंधित लोकांवर वेगवेगळ्या प्रकरणांत कोर्टांमध्ये केसेस दाखल असून त्यांच्या सुनावण्या पेंडींग आहेत. इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्राच्या एका रिपोर्टनुसार मनी लॉन्ड्रिंगचा आरोप करणारा वेगळा गुन्हाही ईडीने दाखल केला होता.

या वर्षी जानेवारी महिन्यात एका सामाजिक कार्यकर्त्याने २०२१ सालच्या न्यायालयाच्या आदेशाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते, जे प्रलंबित आहे. भुजबळयांच्याविरोधात ईडीच्या प्रकरणाव्यतिरिक्त एक खटला प्रलंबित आहे. मुंबई विद्यापीठ भ्रष्टाचार प्रकरणी एसीबीने दाखल केलेला एक खटला विशेष न्यायालयात प्रलंबित आहे. अदिती तटकरे या राष्ट्रवादीचे नेते सुनील तटकरे यांच्या कन्या आहेत.इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार, सिंचन घोटाळ्यात अजित पवार यांच्यासह सुनील तटकरे यांचीच एसीबीकडून चौकशी सुरू होती. एसीबीने २०१७ मध्ये दाखल केलेल्या आरोपपत्रात त्यावेळी आरोपी म्हणून नसले तरी तटकरे यांच्या नावाचा उल्लेख होता. त्यानंतर स्वतंत्र आरोपपत्र दाखल करण्यात येईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले होते. याच प्रकरणात ईडीने २०१२ मध्ये तटकरे यांच्याविरोधात प्राथमिक चौकशी सुरू केली. २०२१ साली धनंजय मुंडे यांच्यावर एका महिलेने बलात्कराचा आरोप करत पोलिसांत तक्रार दाखल केली होती. मात्र त्यांनंतर तिने ही तक्रार मागे घेतली. २ जुलै रोजी प्रफुल्ल पटेल यांनी शपथ घेतली नसली तरीही शपथविधीच्या कार्यकर्माला ते उपस्थित होते.यूपीए सरकारच्या काळात राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल केंद्रीय हवाई उड्डाण मंत्री होते. २००८-०९ च्या काळात परदेशी विमान कंपन्यांना फायदा मिळवून देण्यासाठी दीपक तलवार यांच्याशी संपर्कात होते. आर्थिकदृष्ट्या फायदेशीर असलेले काही हवाई मार्ग दीपक तलवारने तीन आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांना मिळवून दिले.

त्याबद्दल दीपक तलवार यांना २७२ कोटी रूपये मिळाले. यामुळे एअर इंडियाचे मोठे आर्थिक नुकसान झाले होते.हे सर्व व्यवहार प्रफुल्ल पटेल केंद्रीय मंत्री असताना त्यांच्या काळात झाल्याचा आरोप ईडीने लावला होता. याचबरोबर आर्थिक परिस्थिती नसताना ७० हजार कोटी रूपयांची १११ विमानांची खरेदी, एअर इंडिया आणि इंडियन एअरलाईन्सचे विलिनीकरण या प्रकरणाचा तपास ईडीकडून करण्यात येत होता. याप्रकरणी ईडीने जून २०१९ मध्ये प्रफुल्ल पटेल यांना नोटीस बजावली होती. त्यांना चौकशीसाठीही बोलवण्यात आले होते. २०२२ साली महाविकास आघाडीतून बाहेर पडण्यासाठी एकनाथ शिंदे यांनी बंड केलं. शिंदे यांच्यासोबत शिवसेनेचे ३७ आमदार असल्याचा त्यांचा दावा होता. या बंडात शिंदेंसोबत सहभागी झालेल्या नेत्यांपैकी ईडीच्या रडारवर असलेले नेतेदेखील होते. एकनाथ शिंदे यांच्या बंडातील ईडीच्या रडारवर प्रताप सरनाईक,यामिनी जाधव आहेत.

# नवसाची कंदुरी (ग्रामीण कथा )

आधुनिक केसरी

**एखाद्या लेकराला ताप आला की माझी माय देवीला नवस बोलायची? तिचा नवस साधा व सोपा नव्हता, ती उद्याचा विचार करत नव्हती, पैसा-अडका किती खर्च होईल याचा अंदाज तिला नव्हता, बापाला न विचारता मायनी पाच बोकडाची कंदुरी करते म्हणून देवीला नवस बोलली. आम्ही पाच भावंडे होतो, तीन बहिणी माझ्यापेक्षा मोठ्या होत्या, मी चौथा आणि नंतर बंड्या होता, बहिणीचे लग्न झाले होते, त्यामुळे बाप मोकळा झाला होता, कोणत्याही बहिणीला श्रीमंत घर पाहून दिले नाही, जमीनजुमला पाहिला नाही, दूरवरच्या विचारात पडला नाही, डोक्यावरचं ओझं कमी करावं म्हणून नात्यात देऊन मोकळा झाला.**

मोठ्या बहिणीचे घर थोडे श्रीमंत होते, तिच्या सासरचे लोक थोडे शिकलेले होते, पण भांडणे व वादविवाद करायला सर्वात पुढे असत, कधीकधी न शिकलेले बरे असतात, असे म्हणण्याची वेळ येत असे, आमच्या घरी कंदुरी असल्यामुळे बहिणीला निमंत्रण द्यावेच लागते, भारतीय संस्कृतीत 'अतिथी देवो भव 'म्हणतात, सर्वात मोठी बहीण नंदाला आणण्यास मायनी मला पाठवले,


जाते वेळेस सोबत पाच गव्हाच्या रोट्या त्यावर भात आणि गुळाचा खडा टाकला व म्हणाली, सोयरे- यांना अवताणं दे,पुढील मंगळवारी पाच बोकडाची कंदुरी आहे, असं सांगावे, मी तसेच बहिणीच्या घरी जाऊन सांगितलं व त्यांनी मोठ्या बहिणीला माझ्यासोबत पाठवून दिले, मला युद्ध जिंकल्याचा आनंद व्हावा तसा झाला. मी टिरीला पाय लावून बहिणीला घरी घेऊन आलो, इकडे माझा बाप कंदुरी आहे म्हणून कोणाकडूनही पैसे मागत होता. गयावया करीत होता ,भावकीची लोक फिदीफिदी हसत होती.पैसे नसतील तर नवस कशाला करता ? म्हणून हिणवत होती. ही गोष्ट माझ्या मायपर्यंत पोहोचली, तेव्हा बाप वाटेवर आला. परत कोणाकडे त्यांनी हात पसरला नाही. माझी दुसरी बहिण कविताला आणण्यासाठी मायनं मलाच पाठविलं, व म्हणाली' कंदुरीचा आवतणं देऊन कविताला घेऊन ये ? दुपारनंतर जाणाऱ्या बसमध्ये मला बसवून दिलं मी लवकरच बहिणीच्या घरी पोहोचलो.घरात टीव्ही पहात पापड खात बहिणीची नणंद बसली होती.मी घरी गेलो तेव्हा ती मला म्हणाली. पाय धुण्यासाठी तिथून पाणी घे,' मी म्हणालो' ताई कुठे आहे ? तेव्हा ती म्हणाली, शेताला गेली , जेवतोस काय ? मी म्हणालो नाही, तेव्हा ती म्हणाली ,"संध्याकाळी जेवा की बहीण भाऊ एकत्रच,"मी थोडा बाहेर जाऊन मारुतीच्या पारावर बसलो. संध्याकाळ झाली, अंधार पडू लागला. तेव्हा माझी बहिण डोक्यावर लाकडाचा भारा घेऊन आली. तिला बराच दम लागला होता. चेहरा काळवंडला होता.नंतर माझी बहिण स्वयंपाक करण्यासाठी बसली. नणंद काही टीव्ही समोरुन हलत नव्हती ? सासु चार घरी जाऊन जेवायच्या वेळेला बरोबर उतरली.

नवरा फक्त काम करणारा तगडा गडी होता, स्वयंपाक तयार झाला, नणंद म्हणाली' गिळायला बसा,लगेच आम्ही सर्वजण जेवण करत बसलो. तेव्हा बाईचा सासरा म्हणाला" काय काम काढले पाहुणं, मी म्हणालो" कंदुरीचा अवताणं देण्यासाठी आलो," व कविता ताईला घेऊन जावावं म्हणतो,

असं म्हटल्याबरोबर सास-याला ठसका बसला, त्याच्या कपाळावर आठ्या पडल्या, माझ्यावर नजर रोखून म्हणाला, आवतणं किती जणाला आहे ,मी म्हणालो 'सर्वानाच आहे ,मामा, ते म्हणाले "काही हरकत नाही" ,जातो मी आणि बहीण , मामा म्हणाले ,आम्ही आणतो की मंगळवारी असं म्हणून त्याने मला रिकाम्या हाताने पाठविले. माझ्या डोक्यात अनेक वाईट विचार येऊ लागले पण बोलून उपयोग होणार नव्हता,हताश होऊन मी घरी परत आलो. माझ्याकडे पाहून मायला फार वाईट वाटलं.माय म्हणाली 'तू काही मामांना उलट बोलला नाहीस की' मी म्हणालो 'नाही बोललो'. आता तिसऱ्या बहिणीला म्हणजे जनाबाईला घेऊन यायचं होतं, परत मायनं गव्हाच्या रोट्या भाजल्या, मी म्हणालो मी जाणार नाही ? माय म्हणाली" नको जाऊ ;तुझ्या बापाला पाठविते ? माझा बाप काही कमी गुणाचा नव्हता, जनाबाईच्या घरी पोहोचल्यानंतर पाय धुण्यास पाणी दिले, पण बापाने पाय धुण्यास नकार दिला, त्यावर जनाबाईची सासू बापाला म्हणाली" काय पाव्हुणं आमच्या घरात कोणी गचकलं काय ? माझा बाप तेव्हा पाय धुण्यास तयार झाला, बाप निरक्षर होता पण राजकारणाचे त्याला फार वेडं होतं.

प्रत्येक निवडणुकीत नवीन पक्षात प्रवेश करून प्रचार करत, मला ही सांगता येत नव्हतं,बाप नेमका कोणत्या पक्षात आहे, त्याला कधीच कोणते पद मिळालं नाही,पण रूबाब मात्र मोठा होता, बाबांनी जनाबाईच्या सासऱ्याला विचारलं,गावचा सरपंच कोण आहेत म्हणायचं ? तो पाहुणाही बाराचा होता, ते म्हणाले, 'जागा खाली आहे होता काय तुम्ही सरपंच ? तेव्हा बाप गप्प झाला. येण्याचे कारण विचारले तेव्हा म्हणाला" आमच्या अवदसांनी नवस केला देवीला", पाच बोकडाच्या कंदुरीचा,या तुम्ही सर्वजण गिळायला. असं सांगून मोकळा झाला,भल्या पहाटे उठून जनाबाईनी सडा -रांगोळी केली, भाकरी थापल्या ,भात शिजवला, वरणाला फोडणी दिली, तेव्हा नवरा म्हणाला "दिवस कोणत्या दिशेला उगवला आज ? सासू म्हणाली तिला माहेरला पळायचं आहे ?माझ्या मुली आल्या की धाड भरते, आणि हिचा बाप आला की पायाला भिंगरी बांधून तयार होते, म्हणून बडबड करीत अंगणात घिरट्या घालीत होती, शेवटी हो नाही म्हणून बाबांनी जनाबाईला घरी घेऊन आला, सगळ्या लेकी पाहून माझ्या मायला आकाश ठेंगणं झालं. काय करू, काय करू नये, अशा आनंदात ती होती. तिचा चेहरा मोठा झाला होता. भावकीमध्ये सर्वत्र माझ्यापेक्षा कोणी मोठा नाही ? असेही तिला कधीकधी वाटत असे.

माझ्या मायेचा बोलण्याचा आवाज वाढला, तिच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता,भावकी मध्ये मायेला फार प्रतिष्ठा होती. तिचा शब्द कोणी खाली पडू देत नव्हता, गावातील पाटील सुद्धा विचार करून मायला बोलत असतं, आमच्या कंदुरी च्या आवताणं सगळीकडे फिरले, नातेवाईकांची आमच्या गावाकडे येण्यासाठी रांग लागली ,हावसे - नवसे व गवसे सगळे एकत्र आले,आदल्या दिवशी भरपूर धिंगाणा झाला, वाटेल तसे एकमेकांना बोलून घेतले, आमच्या मामाने तर आमच्या छोट्या भावाला कापड घेतली,आम्हाला वाऱ्यावर सोडून दिलं, पण माझी माय फारच हुशार होती, मामाने आणलेल्या कापडावर मायनी घरी घेतलेले कापड ठेऊन पिशवी खुंटीला टांगली होती, मला हे सगळं कळत होतं ,पण बोलता येत नव्हतं ,रात्रीच्याला बाबांनी दहा बैलगाड्या जुंपून ठेवल्या, हौसा काकू सुरुवातीला कंदुरीला मी येणार नाही म्हणाली, जेव्हा माझी माय तिच्याकडे गेली,तेव्हा ती गुमान गाडीत येऊन बसली, त्या रात्री माय झोपलीच नाही. काय काय बांधून घेत होती. ते तिलाच माहीत मला जेव्हा जाग येत होती, तेव्हा ती जागीच दिसली, ।देवीची ओटी खणा- नारळानी भरणार, अंगारे-धुपारे करणार, माझा नवस फेडून सुखाने राहावे, अशी तिला वाटत असे, माझ्या शिक्षणाकडे



ध्यान द्यावं असं माझ्या मायला कधीच वाटलं नाही, शाळेत कधी ती आली नाही, माझ्याबद्दल चौकशी कधी केली नाही, मी शिकावं मोठं व्हावं ,चारचौघात बसावं ,असं स्वप्न माझ्या मायला,कधी पडलं नाही ,एकदा माझ्या शाळेत माझी माय आली, मला फार बरं वाटलं, पण फी घेता गरीबा कडून म्हणून शिक्षकांना भांडायला लागली, इकडे मात्र देवीचा कोप होऊ नये म्हणून मायनी सावकाराकडून व्याजाने पैसे आणले,पाच बोकडाची कंदुरी करून नवस फेडणार होती, पहाटे तीन वाजता गाड्या निघाल्या,माझा बाप सर्वात म्होंर होता,त्याची पाऊले झपाझप पडत होती ,लहान पोरं गाडीमध्ये झोपेतच होती,अधून -मधून बायका देवीचं गाणं गुणगुणत होत्या, "माय भोळ्या भक्ताची।हाय ग गुणाची"।।बैलगाड्या बरोबर कुत्री पळत होती ,त्यांना फार आनंद वाटतं असे, एखादं नवीन कुत्र दिसलं की सर्व एकत्रित येऊन आपापल्या मधील हेवेदावे विसरून मोठेपणा दाखवीत होते, गाडीतून आम्ही जात होतो, एका गाडीत तर पत्रावळ्याचा ढीग पडला होता, द्रोण, ग्लास, खांडाखुंडी करण्याचे सामान,बसण्यास पोते, विळे,खलबते, तांबे, ताटल्या ,वाट्या, भोगणे ,पळी उलथाने, लाकडे ,पीठ, मीठ, तांदूळ, हळद, मसाला, तेल, कांदे, लसूण, वाती, काडीपेटी, अगरबत्ती, काटवट, फुले नागेलीचे पान ,(विडा करण्यासाठी) बैलांना कडबा, अशी एक गाडीच भरली होती, अर्ध घर मायनी रिकामी केलं, मी किती वेळा दुकानांमध्ये गेलो, ते जर मोजले असले तर, कदाचित सचिन तेंडुलकरच्या शतकापेक्षा माझे शतके जास्त झाले असते,असे मला वाटते, कारण मी कधी नाही म्हणालो नाही, तीन बहिणी नंतर मी झालो याचा आनंद माझ्या मायला होता, मलाही मुलगा आहे ही भावकीच्या लोकांना दाखवायचं होतं, सकाळी लवकरच आम्ही देवीच्या गावाला पोहोचलो, देवीचे मंदिर डोंगरावर होतं, डोंगराच्या पायथ्याजवळ नदी होती, पण नदीला पाणी नव्हतं.लोकांनी वाळू उपसा केला होता.नदीच्या काठावर एक विहीर दिसली, त्या ठिकाणी आम्ही आमचा पसारा खाली केला, झाडाची सावली पाहून बैल बांधले, वेड्या हा-यांनी चार पेंढ्या त्यांच्या बैलांना सोडून टाकल्या, आणि इकडे तत्त्वज्ञान सांगत बसला ,माणसाने कसे वागावे, कसे बोलावे ? काय बोलू नये ? कोणाचं काहीही घेऊ नये ? असे तो सांगत होता. काही लहान पोरं झोपेतून उठण्यास तयार नव्हती ,हौसाकाकूनी दोन-तीन पोरांच्या टीरीवर धपाटे मारले, तेव्हा ते डोळे मिचकावून उठले, आपण कोठे आलो हे ही त्यांना कळत नव्हते , मायनी मात्र सर्वाना आदेश दिला, आंघोळ केल्याशिवाय डोंगरांची पायरी कोणी चढू नये ,एका बाजूला बायका तर दुसऱ्या बाजूला गडीमाणसे आंघोळ करत होती, अधून मधून नाऱ्या तिरक्या नजरेने पारीकडे पाहत असे,त्याची आंघोळ काय लवकर होत नव्हती ही गोष्ट मायला कळली तेव्हा ती म्हणाली" आज पहिली बार आंघोळ करता काय ? तेव्हा तो ना-या शुद्धीवर आला , खंड्या, बंड्या, टिल्या नान्या, सोन्या यांना ओढून आणून मायने त्यांच्या डोक्यावर बदाबदा पाणी ओतलं, त्यांच्या अंगावरील जुने कापड काढून घेऊन नवीन कपडे घातले, बाबांनी तोपर्यंत गाडीतील सामान झाडाखाली टाकलं, बाबाचा दोस्त अब्दुल यांच्यासोबत होता, दोघांनी मिळून बायकांना भाकरी करण्यासाठी चुली तयार केल्या,काही बायकांच्या आंघोळी झाल्या होत्या, त्यांना भाकरी करावयास सांगितले. पारूबाई कडे नैवद्य करण्याचे काम दिले, बाबाचा अब्दुल दोस्त होता, देवीचा डोंगराकडे पाच बोकड घेऊन निघाले, त्यांच्याबरोबर संभ्या, हानम्या, सत्या झिरप्या, पिंट्या, गुंड्या, पिऱ्या यांना घेऊन निघाले होते, देवीचे वास्तव्य डोंगरावर का असावे, हे मला काही कळत नव्हतं दमुन भागुन आम्ही सर्वजण देवीच्या मंदिरात पोहोचलो, मनोभावे मायनी देवीची पूजा केली, काही विसरू नये म्हणून अगोदरच पूजेचे साहित्य बांधून ठेवले होते, मंदिराच्या बाहेर आल्यावर सर्व बोकड एका रांगेत उभे केलेण् सर्वांनी त्यांना नैवेद्य दाखवला,गळ्यात नाडा बांधला,भंडारा अंगावर टाकला, डोक्यावर पदर घेऊन मायनी बाबाला हाक मारली, बाबा तुरुंगातून सुटलेल्या कैद्या सारखे मायकडे पळत आला. दोघांनी बोकडाच्या पायाला स्पर्श केला,नवस फेडत आहोत ,असे मनोभावे पूजा केली तरी ही बोकड झडती देत नव्हते ,मायनी सगळ्या जावयांना पाया पडण्यास सांगितलं ,तरी बोकड झडती देत नव्हती ,त्याच वेळेस मायनी मला ओढीत नेऊन बोकडाच्या पायावर लोळवलं,आणि पाणी अंगावर शिंपडले, तेव्हा बोकडाला झडती दिली, त्यामुळे बाबांनी सुटकेचा निःश्वास सोडला, अब्दूलने पाचही बोकडे कापले,देवीला मुंडी व पाय अर्पण करून बाकीचे सर्व काही डोंगराच्या पायथ्याला विहिरीजवळ आणले, तोपर्यंत दुपार झाली होती सगळ्यांच्या पोटात कावळे काव काव करत होते. छोट्या पोरांनी तर धिंगाणा घातला होता. भूक भूक म्हणून भोकाड पसरले. पाहता पाहता भाकरीचा ढीग लागला, रटारट भाजी शिजत होती. वास सर्वत्र दरवळत होता.तेवढ्यात नाम्याला हुशारी सुचली. तो म्हणाला'उद्या खुरमुंडी साठी एक टिंगार ठेवा, अनेक जणांनी होकार दिला, देवीला नैवेद्य दाखवण्या साठी मायनी मला बरोबर घेतलं, आणि सर्वांना तंबी दिली "देवीला नैवेद्य दाखविल्याशिवाय कोणी घास खायाचा नाही".माय आणि मी देवीच्या डोंगरावर गेलो,तो पर्यंत ईकडे बाबा आणि अब्दुल दारू पिऊन तर्र झाले होते, गावातील राम्यांनी तर लिंबूच घरून आणलं होतं, ब-याच जणांना काही कळत नव्हतं, डोंगरावरून परत आल्यानंतर मायनी सर्वत्र नजर फिरवली व पिशवीतून कापड बाहेर काढली, माझा मामा ही शुद्धीत नव्हता. तेव्हा चुलत मामाने बापाला आहेर चढवला ,बापाला धोतर नेसता येत नव्हतं. पण माय हुशार होती, तिने धोतर बापाच्या अंगाला गुंडाळून काढून ठेवले, व म्हणाली "कुडता तेवढा राहू द्या".आणि मी म्हणूनच नांदले, नसता..... सर्व गडबडीत नंदा ताईचा नवरा रुसून बसला.मला नवे कपडे घेतल्याशिवाय मी जेवणार नाही. दुसऱ्या बाजूला पंक्ती बसत होत्या. मायेने सर्वत्र नजर फिरवून पाहुण्याला जेवण्यास सांगितले. देवीच्या नावानं चांगभलं झालं.आणि घास घेणार,तितक्यात अवकाळी पाऊस चालू झाला, भयाण वादळवारा सुटला. बैल हंबरू लागले, झाडे मोडून पडत होती. पालापाचोळा उडत होता. तितक्यात झाडाची एक फांदी मटनाच्या भाजीच्या भोगन्याजवळ येऊन पडली. पावसामुळे चुली भिजल्या आणि विझल्या. कोणी कोणाला काय बोलत आहे ते ही कळेनासे झाले. लेकरे जीव मुठीत धरून मायच्या पदराखाली लपले. तरी राम्या जोरात ओरडत होता, भाजी व भाकरी आणा जी ? त्याच्याकडे कोणाचेच लक्ष नव्हते. तो पर्यंत अब्दुलने झाडाला टांगलेले टिंगार सोडले व त्यांनी घराची वाट धरली. बाकी सर्वांची भूक पळून गेली. नंदाताईचा रूसलेला नवरा गप्प बसला. बऱ्याच जणांची दारू उतरली. सामान अस्ताव्यस्त पडल्यामुळे व भिजल्यामुळे बांधून घेता येत नव्हते, चोहीकडे धिंगाणाच धिंगाणा झाला होता,सगळं भिजून गेलं, घरी परत काही न्यायचं नसतं, म्हणून मायेने तिथं टाकून दिलं, सर्व आवराआवरी झाली. उरलेसुरले सामान बांधले, काही वेळाने पाऊस व वारा थांबला. हौसाकाकू म्हणाली "देवीचा कोप झाला" ? हे ऐकल्यावर मायची तळपायाची आग मस्तकात गेली, डोळ्यात रक्त उतरलं, तिचा अवतार पाहण्यासारखा झाला. चवताळलेल्या वाघिणीसारखी सर्वांच्या मधून माय माझ्या जवळ आली .माझा हात हातात धरून मला देवीच्या डोंगरावर ओढत घेऊन गेली, व देवीला म्हणाली" हे माते चुकले, असेल तर माफ कर, पुढील वर्षी पाच बोकड्याची परत कंदुरी करते" हे ऐकून मी तेथेच डोक्याला हात लावुन खाली बसलो.

**प्रा.बरसमवाड विठ्ठल गणपत,अ. नगर**



# समतोल प्रकल्प कर्मचारी व प्रशासन यंत्रणा अधिकाऱ्यांनी केली गुरुपौर्णिमा साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** रोजी गुरुपौर्णिमा निमित्ताने केशव स्मृती प्रतिष्ठान संचलित समतोल प्रकल्प बाल सहायता केंन्द्राचे कर्मचारी यांनी प्रशासकीय यंत्रणा अधिकारी यांची भेट घेत गुरुपौर्णिमा शुभेच्छा देत साजरा केला गुरुपौर्णिमा उत्सव.

सामाजिक जीवनात गुरूंचे अनन्य साधारण महत्व आहे. आज धेर्यपूर्तीसाठी गुरूंच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असते. अगदी प्राचीन काळातही आपल्याला वशिष्ठ श्री राम, रामकृष्ण विवेकानंद आदी गुरुशिष्यांच्या कार्यातून याची प्रचिती येते. जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी, बालकल्याण समितीचे पद अधिकारी, बालगृह, जिल्हा सामान्य रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयमधील वैद्यकीय अधिकारी, प्रशासन यंत्रणा तसेच रेल्वे पोलीस, जीआरपी, आरपीएफ आदींच्या सहकार्याने समतोल प्रकल्पाच्या अवघड कार्याचा तोल सांभाळला जात आहे. हे सर्व पद अधिकारी वेळोवेळी ज्ञानदानाचे पवित्र कार्य करून आदर्श कुटुंब, समाज, राष्ट्र निर्मितीसाठी ध्येयवेडे, चारित्र्यवान व्यक्तिमत्त्व घडविण्याचे कार्य करीत आहेत. त्याच सोबत समतोल प्रकल्प कर्मचारी यांचे गुरू बनून वेळोवेळी मार्गदर्शन व मदत करीत असतात. आज गुरुपौर्णिमा दिनाचे ओचित्य साधत समतोल प्रकल्प व्यवस्थापक प्रदिप पाटील, प्रवीण नायसे सर, टीम सदस्य विश्वजित सपकाळे , रविना भगत यांनी प्रशासन यंत्रणा पद अधिकारी यांची भेट घेऊन समतोल प्रकल्पाची कामाची माहिती देत समतोल प्रकल्पाचे माहिती पत्रक व गुलाबपुष्प देऊन सत्कार करत गुरुपौर्णिमेच्या अनंत शुभेच्छा आणि करीत असलेल्या निष्काम कर्तृत्वास सविनय वंदन करीत आभार मानत त्यांच्या समवेत गुरुपौर्णिमा उत्सव साजरा केला.

# प्रवेश शुल्कातून तलाठी भरतीसाठी होणारी लूट थांबवा

## मा. सभापती धरमसिंग चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** राज्याच्या महसूल विभागाने तलाठी गट 'क' पदाची मेगाभरती करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. तब्बल राज्यभरात एकूण ४६४४ पदे भरण्यासाठी जाहिरात काढली आहे. यामुळे तलाठी पदासाठी प्रयत्न करणाऱ्या सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. मात्र, यासाठी अर्ज फी एक हजार रुपये व फॉर्म भरण्याचे पाचशे रुपये असल्यामुळे बऱ्याच उमेदवारांच्या खिशाला मोठी कात्री बसणार आहे. सर्वसामान्य उमेदवारांनी परीक्षा शुल्कासाठी आकारलेले इतके पैसे कुठून आणायचे ? असा सवाल सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केला आहे भरमसाट फी आकारणी, त्यात फॉर्म भरून देण्यासाठी ५०० रुपये खर्च, दीड हजार रुपये शुल्क आकारून शासनाकडून बेरोजगारांची लूट सुरू आहे, अशी टीकाही त्यांनी केली आहे. २०१९ मध्ये तलाठी पदाची जाहिरात काढण्यात आली होती. त्यामध्ये राखीव प्रवर्गासाठी ३५० तर खुला प्रवर्गासाठी ५०० रुपयांचा परीक्षा आहे. शुल्क आकारण्यात आले होते. चार वर्षानंतर नेमके काय बदलले, की आता पुन्हा तलाठी पदाची जाहिरात काढली जात असताना, त्यामध्ये दोन्ही प्रवर्गातील परीक्षा शुल्कात भरमसाट वाढ करण्यात आली आहे. आधीच असताना फरफड नाजूक परिस्थिती आहे. बेरोजगारीची उमेदवारांची परिस्थिती नसताना, राज्य शासनातील शासकीय नोकरीचे स्वप्ननं पाहणाऱ्या सर्वसामान्य उमेदवारांचे परीक्षा शुल्का अभावी हिरमोड होण्याची शक्यता आहे. ४६४४ पदासाठी नक्कीच लाखो उमेदवारांचे अर्ज येतील. कोट्यवधी रुपयांचा शासनाचा गल्ला तयार होईल. बेरोजगार युवकांना असे लुटून शासनाला काय मिळणार आहे ? असा सवालही सभापती धरमसिंग चव्हाण यांनी उपस्थित केला आहे.



# आवरे शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** सेवा निवृत्त कर्मचारी संघ उरण तर्फे उरण तालुक्यातील आवरे शाळेत 4 जुलै रोजी शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्वेता दबडे यांनी शालेय जीवनात मुलांना आनंदाने शिक्षण कसे द्यावे याविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.साहेबराव ओहळ, संध्याराणी ओहाळ,वसंत कुडव,सुनिल पाटील, सुरेश भोईर, बळीराम थळी आदी मान्यवर उपस्थित होते. संजय धबडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी सरपंच निराताई पाटील, मुख्याध्यापक बबन पाटील, अरुणा तिरमाळी, निर्भय म्हात्रे, आहेर, गणेशप्रसाद गावंड, कोल्हे मॅडम तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सोमनाथ म्हात्रे, शंकर पाटील, प्रमोद म्हात्रे, अलका गावंड, सुवर्णा म्हात्रे, प्रतीक्षा गावंड, माई म्हात्रे, रुपाली चव्हाण उपस्थित होते. सामाजिक बांधिलकी जपत सेवा निवृत्त कर्मचारी संघाने शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. या मुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर यावेळी वेगळाच आनंद दिसून आला.

अर्जंट पाहिजेत
बॅक ऑफिससाठी महिला (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक), अनुभवी सुपरवायजर, मार्केटिंग प्रतिनीधी (स्वत:ची टू-व्हीलर आवश्यक) आणि अनुभवी सेक्युरिटी गार्ड पाहिजे.
संपर्क - 9822982958

# निकिताचे राष्ट्रीय गतका क्रीडा स्पर्धेत यश; मान्यवरांच्या हस्ते गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** जिल्ह्यातील वैद्य वडगाव येथील निकिता रामेश्वर वैद्य या महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी खेलो इंडिया आणि राष्ट्रीय गतका असोसिएशनच्या माध्यमातून मराठवाड्याचे नेतृत्व करत गतका खेळात राष्ट्रीय स्तरावर कांस्यपदक तर टेनिस हॉलीबॉल स्पर्धेमध्ये राज्यस्तरावर सुवर्णपदकाची कमाई करत घवघवीत यश संपादन केले.क्रीडाक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावली त्याबद्दल निकिता वैद्य हिस प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सेलू येथील नूतन विद्यालय शिक्षण संस्था वर्धापन दिन व श्रीराम भांगडीया स्मृतिदिनानिमित्त क्रीडा क्षेत्रातील गुणवंत खेळाडूंचा सत्कारसमारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास अध्यक्ष डॉ.एस.एम.लोया, प्रमुख पाहुणे जालना येथील डॉ.ऋषिकेश दीक्षित, संस्था उपाध्यक्ष डी.के देशपांडे,सचिव जयप्रकाश बियाणी, प्राचार्य डॉ.विनायकराव कोठेकर,डॉ.महेंद्र शिंदे, प्राचार्य एन.पी पाटील, मुख्याध्यापक नारायण सोळंके, सुखानंद बेंडसुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

खेलो इंडियाच्या माध्यमातून युवकांना शालेय जीवनातच खेळाविषयी आवड निर्माण होऊन आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू निर्माण व्हावे या उद्देशाने देशाच्या विविध भागात राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले जाते.त्याचाच एक भाग म्हणून निकिता वैद्य हिने पंजाब राज्यातील भटिंडा येथे झालेल्या राष्ट्रीय गतका क्रीडा स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवरील कांस्यपदक तर सातारा



येथे झालेल्या राज्यस्तरीय टेनिस हॉलीबॉल स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले आहे.नगर येथील बॉक्सिंग स्पर्धेतही तिने रौप्यपदकाची कमाई केली होती. जालना आणि परभणी येथे झालेल्या क्रीडा स्पर्धेतही तिने यश संपादन केले होते. ग्रामीण भागात क्रीडा सुविधां,मार्गदर्शनाचा अभाव तसेच क्रीडा क्षेत्राविषयीची कुठलीही पार्श्वभूमी नसताना देखील आई-वडिलांची खंबीर साथ,गुरुजनांचे मार्गदर्शन,स्वतःची जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर निकिताने राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील यश संपादन केले. तिला या कामी क्रीडा शिक्षक पांडुरंग आंभोरे, पंकज सोनी,नागेश कान्हेकर तसेच वडील रामेश्वर वैद्य यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत मिळवलेल्या यशाबद्दल निकिता वैद्यचा मान्यवरांच्या हस्ते नुकताच गौरव करण्यात आला.कौतुक होत आहे.


|| नमो ||
शुभ कार्य तुमचे व्यवस्था आमची

विनोद मंडप
डेकोरेटर्स अँड केटरर्स
लग्न, मुंज, रिसेप्शन, वाढदिवस, वास्तूशांती, शुभ कार्याच्या ऑर्डर स्वीकारल्या जातील.
प्रो.प्रा. विनोद जोगदंडे
9158500727, 8446185722
टाऊन हॉल, व्हीआयपी रोड, छत्रपती संभाजीगर




# पोलीस अधीक्षक रेड्डी यांची अवैध धंद्यांवर धडक कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

निलकंठ कराड
**शेवगाव :** पोलीस ठाण्यात परिविक्षाधीन सहायक पोलिस अधीक्षक बी.चंद्रकांत रेड्डी प्रभारी अधिकारी म्हणून हजर झाल्यानंतर शहरातील अवैध धंदे बंद झाले असल्याचे परिस्थिती निर्माण झाली होती मात्र काही दिवसांपासून शहरात अवैध मावा विक्री मोठ्या प्रमाणात सुरू झाली शहरातील विविध भागात गल्ली बोळात मावा गुटखा विक्री सुरू झाल्याने तो चर्चेचा विषय ठरला होता. शेवगाव पोलीस स्टेशनचे प्रभारी बी.चद्रक्रांत रेड्डी यांना गुप्त.बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की शेवगाव शहरात वेगवेगळ्या ठिकाणी अवैध्द.मावा विक्री चालु आहे. सदर माहीती अनुशंगाने दोन पथके तयार करुन पथकासह तीन ठिकाणी कारवाई केली आहे. त्यामध्ये चार जणांना अवैध मावा गुटखा विक्री करताना मुद्देमालासह ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे. 1) गुरनं-602/2023 भांदवि कलम 328,188,272,273 प्रमाणे दाखल गुन्ह्यातील आरोपी नामे अब्दुल हन्नान रफिक सय्यद वय-29 वर्षे रा.नाईकवाडी मोहल्ला शेवगाव यास सकाळी ६.३० वा. शेवगाव ते भातकुडगाव रोडवर अजिक्य हॉटेल समोर गाडी नं MH 16 CW 6825 या गाडीवर अवैध मावा वाहतुक करताना मिळुन आला. सदर आरोपीकडे ५० हजार रु किंमतीची स्कुटी व ३२ हजार रु किमतीचा ३२ किलो मावा मिळुन आल्याने सदर आरोपी विरुध्द.गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

2) गुरनं. 603/2023 भांदवि कलम 328,188,272,273 प्रमाणे दाखल गुन्ह्यातील आरोपी नामे कदीर कादर शेख वय-४०वर्षे रा.नवीन बाजार तळ शेवगाव यास सकाळी ७.४५ वा चे सुमारास नवीन बाजार तळ येथील किस्मत पान स्टॉल मध्ये मावा विक्री करताना मिळुन आला.सदर आरोपीकडे ३ हजार रु किमतीचा ३ किलो मावा मिळुन , १हजार ८०० रु किमतीची बारीक सुपारी व ३ हजार रु किमततीची सुगधी तंबाखु असा एकुन ७ हजार ८०० रु किमतीचा मुद्देमाल मिळुन आल्याने सदर आरोपी विरुध्द.गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

3) गु.र.न.604/2023 भांदवि 328,188,272,273,34 प्रमाणे दाखल गुन्ह्यात आरोपी नामे सुशिल मोहन नरवडे वय-२९ रा.सोनमिय्या वस्ती शेवगाव, विश्वास दत्तात्रय मगर वय-२४ वर्षे रा.सम्राट अशोकनगर शेवगाव याचेकडे दोस्तीपान शॉप समोर दोघे आपसात मावा खरेदी विक्री व्यवहार करत असताना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातील ३ हजार रुपये किंमतीचा ३ किलो मावा मिळुन आला. वरील अ.क्र.१ ते ४ आरोपीता विरुध्द. शेवगाव पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हांचा तपास सपोनि/आशिष शेळके हे करत आहे.

# पोलीस उपनिरीक्षकपदी पूजा चव्हाणची निवड



आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये खुलताबाद तालुक्यातील सुलतानपूर येथील पूजा चव्हाण (काळे)हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा उत्तीर्ण करत पोलीस उपनिरीक्षक होण्याचा मान पटकाविला. पूजाने अनेक अडचणींवर मात करत यश संपादन केले आहे. तिच्या यशाबद्दल सुलतानपूर व माहेर ताजनापूर गावकऱ्यांकडून आणि विविध क्षेत्रातून तिचे अभिनंदन होत आहे.



# वडिलांच्या स्मरणार्थ विविध एक हजार झाडांची लागवड

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** येथील ज्येष्ठ समाजसेवक आनंद काशिनाथ तायडे यांचे दि. २३ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांच्या मोठया मुलाने डॉ.अमरकुमार आनंद तायडे यांनी वडिलांच्या स्मरणार्थ बुलढाणा जिल्हा मध्ये एक हजार झाडे लावायचा संकल्प केला आहे. त्यानुसार त्यांनी मलकापूर नांदुरा, दाताला, तालसवाळा, टाकरखेड, तसेच घराजवळ, गार्डन मध्ये, कॉलनी मध्ये, रस्ता लागत, शेतात, विहार मध्ये, मंदिरामध्ये, नगर पालिका क्षेत्रात तसेच ग्रामीण भागात, गार्डन मध्ये लागवड करतच नसून जर आपल्याला आपल्या परिसरात झाडे लावायचे असल्या झाडे मोफत देत उपलब्ध करून देत आहेत व अनेक ठिकाणी स्वतः झाडे लावण्याचे काम सुरू केले आहे. त्यानुसार जिल्ह्यातील नागरिकांना झाडांचे वाटप करण्यात येत आहे. डॉ.अमरकुमार तायडे यांचा सामाजिक कार्यात नेहमीच सहभाग असतो. सिमेंटची जंगले वाढत असताना झाडांची कत्तल केली जात आहे. त्यामुळे पर्यावरणाचे अतोनात नुकसान होत आहे. त्याचे परिणाम सर्वांना भोगावे लागतात. झाडे कमी झाल्यामुळे वातावरणाचे संतुलन बिघडले असल्यामुळे वृक्षलागवड केली पाहिजे, याबाबत अमर युवकांना नेहमीच मार्गदर्शन करीत आहेत. ते गेली अनेक वर्षे मलकापूर तालुका व गावामध्ये झाडे लावत आहेत. यावेळी आपल्या वडिलांच्या आठवणी सदैव आपल्या सोबत रहाव्यात म्हणून त्यांनी वृक्ष लावण्याचा संकल्प करून प्रत्यक्षात वृक्षलागवडीला सुरुवात केली.



# फुलंब्री तालुक्यात बकरी ईद उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यात 29 जून रोजी बकरी ईद उत्साहात साजरी करण्यात आली. बकरी ईद म्हणजे त्याग व बलीदान होय, मुस्लिम समाजाच्या वतीने बकरी ईद साजरी केली गेली. यावेळी फुलंब्री शहरातील मुफ्ती नईम पटेल यांनी जगात शांतेते साठी दुआ केली. सगळीकडे शांतता राहावे, हिंदु -मुस्लिम- दलित- शिख- इसाई सर्व भाई असा संदेश देण्यात आला.या प्रसंगी पोलीस उपविभागीय अधिकारी जयदत्त भवर, पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे, पोलीस उपनिरीक्षक वाघमारे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे फुलंब्री तालुकाध्यक्ष अजय गंगावणे, जेष्ठ नेते नफीस पटेल, सामाजिक कार्यकर्ते मोबीन पाशा, पत्रकार इम्रान खान, दैनिक आधुनिक केशरी प्रतिनिधी सुधाकर जेठे दैनिक लोकरत्नचे पत्रकार सरफराज पटेल, इस्माईल खान, बिस्मिल्ला शहा यांच्या सह आदींची उपस्थिती होती.



## अर्जंट फ्लॅट विकणे आहे

नक्षत्रवाडी, छत्रपती संभाजीनगर, (महाराष्ट्र) येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ.

संपर्क : मो. 7588818406




# कृषी विभागाच्या वतीने कृषी दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील कृषी विभागाच्या वतीने पंचायत समिती सभागृहात साजरी करण्यात आली.
यावेळी तालुक्यातील कृषी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या शेतकरी, कर्मचारी, ग्रामपंचायत स्तरावर काम करणारे ग्रामपंचायत ऑपरेटर आदींचा सत्कार यावेळी करण्यात आला.
या कार्यक्रमात तालुका कृषी अधिकारी भारत कासार मंडळ कृषी अधिकारी निवृत्ती जोरी, कृषी विस्तार अधिकारी सुदाम शेंगुळे, गणेश पवार, शून्य मशागत तंत्रज्ञान गुलाबराव खंडागळे, जगदीश जाधव, कृषी विभागाचे सर्व कृषी सहाय्यक, पंचायत समितीचे कर्मचारी हजर होते.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल गोराडे यांनी तर आभार मकरंद ननावरे यांनी मानले.

## हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे



पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# भोकर तालुक्यात शेतकरी हवालदिल; दुबार पेरणीचं संकट

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** अवघ्या सृष्टीच लेण असलेल्या पाऊसधारानी निसर्गाच रूप पालटून जात..धर्तीवर जणु हिरवाईचा कूंचला अवतरतो तेंव्हा चैतन्याची कीनार झळाळून येते..अशा कीमयागार जलधारा दडुन बसल्याने निसर्गाच वैभव होरपळून जात आहे..भेगाळलेली धरती आणि चातकाचा घसा कोरडाच आहे..तीन नक्षत्रात झालेल्या थोड्याफार शिरकाव्यान  खरिपाची पेरणी झाली..आकाशाकडे झेपावणारे बिजाकूंर हिरमुसले झाले आहेत..पाऊस कुण्या जन्माचा बदला घेत आहे हे समजत नाही..दूबार पेरणीची भीती मनात काहुर माजवते आहे..हे घना कारे रूष्ट झालास आमच्यावरी..?,असा सवाल हवालदिल झालेले शेतकरी  वरूणराजा कडे करीत आहेत.

श्रूतु सोहळे साजरे होत असताना प्रत्येक रूतू हे आपलं अस्तित्त्व सिद्ध करीत निसर्गाशी एकरूप होऊन सौंदर्य खूलवीत असतं.यातील वर्षाश्रूतु हा निसर्गाचा दागीणा म्हणून ओळखला जातो.तोच श्रूतु आजघडीला आपली नखे काढताना दिसत आहे. एका थेंबासाठी आसुसलेली धरती आणि चातकास हूलकावणी देत सतावते आहे. तृषात पाखरांच्या चोचीत अमृतधारानी सिंचन करून तृप्त करणारी जलधारा यंदा लपाछपीचा डाव खेळते आहे. हवामान विभागाने यंदा पाऊस अधिक प्रसन्न होईल असे भाकीत केले होते. त्यामुळे शेतकरी वर्गात आनंदाला उधाण आलं होतं. पूर्वपावसाळी कामे आटोपून शिवार सजवून ठेवलं.घरातील जमा केलेली पूंजी महागडं बि-बियाण, खंत,औषधी घेऊन शेतकरी राजा खरिप पेरणीसाठी सज्ज झाला.लहरी निसर्ग मात्र आपल्याच तोऱ्यात वावरत होता.पावसाळा सूरू होताच सारे चराचर पावसाच्या आगमनाची आतुरतेनी प्रतिक्षा करीत होता. पाऊससरी काही केल्या बरसल्या नाहीत. रोहिणी, मृग आणि आर्द्रा नक्षत्र अक्षरा कोरडे गेले काहि भागात शेतकऱ्यांनी धुळ पेरणी केली. थोडाफार पाऊस झाल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांनी खरीपाची पेरणी केली. वातावरणात गारवा निर्माण झाल्याने मातीतील ओलाव्यान बिजाकूंर तरारून गेली. जिवीताची ऊर्जा त्या कोंबात अवतरली. अशातच पावसाने दडी मारल्याने ऊन्हाचा



चटका, उकाड्याने रोपटे क्षीण झाली दूबारपेरणीच्या भितीन शेतकरी चिंतातुर झाला आहे.वरूणराजाला प्रसन्न करण्यासाठी गावोगावी भंडारा, प्रार्थना केली जात आहे. तुच आमची उदासीनता दूर करून सृजनाचा साक्षात्कार कर, तहानलेल्या, आसुसलेल्या डोळ्यात जिवनाचा मेघ होऊन लवकर प्रकट व्हावा अशी याचना शेतकरी करीत आहे. काही केल्या सरी बरसत नाहीत.येणा-या काळात पाऊस झाला तर ठिक नाहीतर दूष्काळास समोर जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.




# विलासबापू भुमरे यांची सहकार क्षेत्रात दमदार एंट्री

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** रेणुकादेवी शरद  सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून येत्या गळीत हगामात  ऊसाच्या वाढीव शेत्राचा विचार करून आडीच  हजार टनांपर्यंत क्रेसींगची वाढ खरुन उत्पादनावर भर दिला जाईल, अशी ग्वाही कारखान्याचे चेअरमन विलासबापु भुमरे यांनी दिली.

महाराष्ट्र राज्याचे रोहयो तथा औरंगाबादचे पालकमंत्री संदीपान भुमरे यांचे सुपुत्र विलासबापू यांची या माध्यमातून सहकार शेत्रात दमदार पदार्पण केले असून पालकमंत्री भुमरे याच्या नेत्वृवाखाली रेणकादेवी शरद सहकारी कारखान्याची निवडणूक १४ जागेवर बिनविरोध व ७ जागेवर निवडीच्या माध्यमातून वर्चस्व दाखवत पून्हा कारखाना ताब्यात घेतला.

दरम्यान कारखान्याच्या चेअरमन आणि व्हाईस चेअरमन पदासाठी मंगळवार ४ जुलै रोजी बैठक झाली यामध्ये रेणुकादेवी शरद  कारखान्याच्या चेअरमनपदी  विलासबापु भुमरि यांची तर व्हाईस चेअरमनपदी नंदु पठाडे  यांची बिनविरोध निवड करण्यात आली. कारखान्याची निवडणूक नुकतीच बिनविरोध झाली. यानिमित आयोजित सत्कार समारंभाला उत्तर देताना विलासबापु म्हणाले कि  कारखान्याच्या माध्यमातून शेतकरी, सभासद आणि कर्मचाऱ्यांची आर्थिक प्रगती करण्यावर भर दिला जाईल.

विलासबापू भुमरे सह  नव नियुक्त संचालकांनी घेतले संत एकनाथ महाराज समाधीचे  दर्शन विलासबापु भुमरे  यांची चेअरमन पदी निवड झाल्याबद्दल नाथ महाराज संस्थानच्या वतीने  त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले . यावेळी सर्व विजयी संचालकांचेही पुष्पहार घालून स्वागत व अभिनंदन करण्यात आले. यावेळी मार्केट कमेटीचे   सभापती राजुनाना भुमरे,  मुंबई दुध संघाचे संचालक नंदलाल काळे,नाथ संस्थानचे दादा बारे, सरपंच शिवराज भुमरे, माजी नगरसेवक भुषण कावसानकर,कि शोर चौधरी, जनार्दन मिटकर, कारखान्याचे मुख्यकार्यकारी अधिकारी नामदेव बावडकर,चेअरमन दत्तात्रय रेवडकर, श्रीमंत टेकाळे, मयूर दिवटे सह सर्व संचालक

गवांदे चंद्रकांत भुजंगराव डांगे, लक्ष्मण दगडु नवथर, विष्णु श्रीपत तांबे नितिन जनार्धन नरके ब्रम्हदेव सुखदेव वाकडे, भिमराव जयराम डुकरे, अक्षय घनशाम बोडखे, शेख अफसर, बशीर, गोजरे सुभाष, त्रिंबक थोरे, अमोल गणेश चावरे, सुभाषराव नानासाहेब तवार, भरत बापुसाहेब भुमरे, राजु आसाराम धायकर, कल्याण लक्ष्मण गाभुड, भागीरथीबाई मुरलीधर लांडगे, पुष्पाबाई भारत काकडे, द्वारकाबाई भाऊसाहेब बढे, ज्ञानदेव तात्याबा उपस्थित होते.

# ज्ञानकुंज महाविद्यालयामध्ये गुरुपौर्णिमा उत्सव साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील ज्ञानकुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व ज्ञानकुंज इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल येथे गुरुपौर्णिमा उत्सवात साजरी याप्रसंगी सूत्रसंचालन महाविद्यालयाची विद्यार्थिनी साक्षी नलावडे, ऋतुजा राऊत,या विद्यार्थिनीने केले. कला वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी गुरु पौर्णिमा निमित्त गुरु विषयी आपले मनोगत व्यक्त केले व आभार प्रदर्शन विद्यालयाचे विद्यार्थिनी तेजस्विनी निकम ने केले याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश झुंजुर्के प्रा. मनोज राणे,श्रीमती योगिता पारनेरे  नितीन पवार, राम राठोड श्रीमती वृषाली कुलकर्णी, कृष्णा चव्हाण, अविनाश गाडेकर, योगेश सुरडकर, श्रीमती सुरेखा जाधव, दीपक पाटील,राहुल गायकवाड, श्री भूषण जाधव, अविनाश कोलते,   अक्षय जाधव, श्रीमती नलावडे, पाचवने मॅडम, खान मॅडम, चोपडे मॅडम, आजिनाथ जाधव, धुमाल बाबा यांची उपस्थिती होती.



# गरीब विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारणाऱ्या संस्थेविरुद्ध कारवाई करा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जो.रा.सिटी हायस्कुल प्राचार्य व संचालक मंडळ फक्त उच्च वर्गीय, व्यापारी-उद्योगपती वर्गाच्या विद्यार्थ्यांकडून प्रचंड प्रमाणात फी आकारून पालकांची लूट करत असून सदर संस्थेमध्ये गोरगरीब, मागासवर्गीय, आदिवासी विद्यार्थ्यांना पैसे नाहीत म्हणून प्रवेश नाकारला जात आहे असा आरोप युवा सेनेतर्फे करण्यात येत आहे. खासगी संस्थांनी मनमानी फी आकारणी करून विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवू नये, गोरगरीब विद्यार्थ्यांची पिळवणूक करू नये, असे धोरण असतांना संस्थाचालक शासनाच्या धोरणांना हरताळ फासत आहेत.

या संस्थेमध्ये फक्त उच्चवर्णीय विद्यार्थ्यांना शिक्षण मिळत असून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले जात आहे, ही अत्यंत गंभीर बाब असून घटनेच्या मूलभूत तत्वांना बासनात गुंडाळण्याचा प्रयत्न होत आहे. वास्तविक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी मध्ये सवलत असताना फी घेता येत नाही म्हणून आठ ते दहा हजार डोनेशन मागितले जात आहे, सदर रकमेची कुठलीही नोंद पावती दिली जात नाही. शासनाकडून लाखो रुपये अनुदान उकळायचे, आणि विद्यार्थ्यांकडून डोनेशन घेऊन अक्षरशः लुटमार सुरू आहे, संस्था अनुदानित असताना विनाअनुदानित तुकड्या केवळ पैसे उकळण्याच्या हेतूने वाढविल्या जात आहेत, अत्यंत भयंकर म्हणजे अनुदानित संस्थेचे शिक्षकच विनाअनुदानित तुकड्या चालवीत आहेत. विद्यार्थ्यांना पुरेसे स्वच्छतागृहे नसून नियमित साफसफाई देखील होत नाही, यामुळे महाविद्यालयाच्या आवारात प्रचंड दुर्गंधी होत आहे, विद्यार्थ्यांना पिण्यासाठी स्वच्छ व शुद्ध पाणी संस्था पुरवू शकत नाही.

मात्र फी व डोनेशनच्या नावाखाली पालकांची प्रचंड लूट होत असून, याप्रकरणी वरिष्ठ पातळीवरून विभागीय चौकशी लावण्यात यावी, प्रवेश नाकारणाऱ्या संस्थेविरुद्ध कठोर कारवाई करावी अशी मागणी धुळे जिल्हा युवासेनेच्या वतीने शिक्षणाधिकारी यांना करण्यात आली आहे.

याबाबत निवेदन देतेवेळी युवासेना जिल्हाप्रमुख हरीष माळी, उपजिल्हाप्रमुख कुणाल कानकाटे, महानगरप्रमुख मनोज जाधव, विधानसभा प्रमुख योगेश मराठे, जित पाटील, सिद्धेश नाशिककर, निलेश चौधरी, भूषण चौधरी, जयेश फुलपगारे, तुषार सातपुते, शुभम फुलपगारे, आदी युवासेना पदाधिकारी व युवासैनिक उपस्थित होते.



# नाल्यात बैलगाडी वाहून गेल्याने एक जण बेपत्ता व दोन जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** तालुक्यात अचानक दुपारी चार जुलै रोजी ढगफुटी सदृश्य पाऊस झाला या पावसात तिघेजण वाहून गेले त्यापैकी दोघे वाचले असून एक बेपत्ता घालायची घटना घडली व बेपत्ता शेतकऱ्यांचा सुरू आहे. सविस्तर वृत्त असे आहे की लोणार तालुक्यातील शिवनीजाट येते अचानक ढग फुटी झाल्यामुळे दुपारी4 वाजेच्या दरम्यान शिवनी जाट येथे शेतातून काम करून घरी जात असताना बैलगाडी घेऊन जात असताना नाल्याला पूर आल्याने बैलगाडी वाहून गेली. यामध्ये समाधान श्रीराम सरकटे वय ( 40 ) बे पत्ता झाले व केशव धनराज बरडे वय ( 45 ) व त्यांचे सोबत असलेले तिसरे शेतकरी हे दोघेजण पाण्यात त्यांच्या हातात झाड लागल्यामुळे ते दोघे सुखरूप वाचले व समाधान श्रीराम सरकटे पाण्यात वाहून हा बेपत्ता झाला असल्याची माहिती आहे परंतु उद्यापर्यंत समाधान सरकटे यांचा शोध घेतला. असता ते अद्याप मिळाले नसुन यामध्ये एक बैलाचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. यावेळी घटनेची माहिती मिळताच तहसीलदार गिरीश जोशी, नायब तहसीलदार रामकीसन डोळे, ठाणेदार विजयसिंह राजपूत, शिवछत्र मित्र मडळाचे अध्यक्ष नंदकिशोर मापारी, सह महसूल प्रशासन व ग्रामस्थ उपस्थित होते.







# रखुमाऊली सोहळा आषाढीचा ई-काव्य विशेषांकाचे प्रकाशन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर प्रतिष्ठान संचलित शब्दस्वरुप साहित्य मंच ब्रह्मगांव परिवाराच्या रखुमाऊली सोहळा आषाढीचा इ-काव्यविशेषांकाचे प्रकाशन रविवारी २ जुलै२०२३ रोजी रात्री ठीक ८ वाजता मुकूंदवाडी छत्रपती संभाजीनगर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले. छत्रपती संभाजीनगर प्रतिष्ठान संचलित शब्दस्वरुप साहित्य मंचाच्या रखुमाऊली सोहळा आषाढीचा या काव्यविशेषांकाचे प्रकाशन बाबुराव घोंगडे ( अप्पा ) व सौ.मनिषा घोंगडे यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाचे उद्‌घाटन संस्थेच्या अध्यक्षा सौ. पूजा घोंगडे यांनी प्रतिमापूजन व दिपप्रज्वलनाने केले. रखुमाऊली विशेषांकाच्या मुखपृष्ठाचे अनावरण व मुख्य प्रकाशन सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ.पूजा घोंगडे यांनी केले. विशेषांकातील काही भक्तीमय रचना सादर करुन सौ.घोंगडे यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर दिगंबर काळे यांनी केले. या कार्यक्रमासाठी राजेश घोंगडे, योगेश घोंगडे, दीक्षा घोंगडे, यांच्यासह आदी उपस्थित होते. उपस्थितांचे आभार वंदना ज्ञानेश्वर काळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विलास नवसागरे, सौ.प्रियांका कमलेश काळे, यांनी परिश्रम घेतले. रखुमाऊली सोहळा आषाढीचा काव्यविशेषांकाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# विद्यालयात साप; विद्यार्थ्यांसह गुरुजनांची उडाली भंबेरी

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** शहरातील कै. विश्वनाथ राव नळगे विद्यालयाच्या प्राथमिक विभागाच्या शाळा परिसरात भला मोठा साप दिसताच पळा पळा.. साप साप.. म्हणत विद्यार्थी ओरडत पळत सुटले. गुरुजनानी काय झाले म्हणत माहिती घेतली असता एक साप शाळा परिसरातील अवार भिंती लगत अडगळीत असल्याची माहिती मिळाली. साप दिसताच विद्यार्थ्यांसह गुरुजनांची भंबेरी उडाली. शाळा प्रशासनाने सर्पमित्रास पाचारण केले. सर्पमित्राने सदर सापास पकडुन त्यास जंगलात सोडून दिल्याची घटना दि. ४ जुलै रोजी सकाळी घडली. शहरातील विठ्ठलवाडी परिसरात कै. विश्वनाथ राव नळगे विद्यालयाच्या भिंती लगत अडगळीत एक साप असल्याचे काही विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी आरडाओरड केली. मग त्याकडे शिक्षक मंडळींनी ही धाव घेतली. कांहीं जाणकारांच्या लक्षात आले की, सदरील साप हा धामिन जातीची आहे. मात्र धामिनिस पकडण्याची कुणाचीही हिम्मत होईना. मग गुरुजनानी विश्व हिंदू परिषदेचे तालुकाध्यक्ष अंबादास पाटील पवार व स्वच्छतादुत राजीव तिडके यांच्या सहकार्याने सर्पमित्र गणेश बोडखे यांना पाचारण करण्यात आले. त्यांनी अवघ्या कांहीं वेळात धामिन जातीच्या भल्या मोठ्या सापास पकडुन जंगलात सुरक्षित रित्या सोडून दिले. याप्रसंगी सर्पमित्र गणेश यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना सापाची सविस्तर माहिती दिली. यावेळी शाळेच्या सहशिक्षिका तथा माजी नगरसेविका शोभाताई नळगे - बगडे, सहशिक्षक रवी चव्हाण, श्रीमती वाले, ठाकूर, अंकुलवार, उत्तरवार, शैलेश घोरबांड, सचिन घोडके, योगेश वाघमारे सह बहुसंख्येने विध्यार्त्यांची उपस्थिती होती.

# भोकरला शुक्रवारी महारोजगार मेळावा

आधुनिक केसरी न्यूज




**भोकर :** सुशिक्षित बेरोजगारांची वाढती संख्या लक्षात घेता त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी नामांकित कंपन्यांना बोलावून शुक्रवारी ( ता.सात ) महा रोजगार मेळावा घेण्याचे काम नामदेव आयलवाड मित्र मंडळाच्या वतीने हाती घेण्यात आले आहे. #शहरातील संगम फंक्शन हॉल रेल्वे स्टेशन रोड येथे सकाळी११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. शिक्षण घेऊन देखील नोकऱ्या लागण्याचे प्रमाण फार कमी झाल्याने सुशिक्षित बेरोजगारांसाठी आयटीआय उत्तीर्ण झालेले विद्यार्थी एमसीव्हीसी कोर्स केलेले डिप्लोमा बीई इंजीनियरिंग बीए बीकॉम पदवीधर सुशिक्षित बेरोजगारांसाठी हा मेळावा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. नामांकित कंपन्यांची हजेरी या ठिकाणी राहणार आहे भोकर तालुका व जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगारांना संधी मिळावी म्हणून नामदेव आयलवाड मित्र मंडळाच्या वतीने मेळावा आयोजित करण्यात आला असून पाचवी ते बारावी पर्यंतचे सर्व विद्यार्थी आयटीआय ट्रेड केलेले एम सी व्ही सी कोर्स झालेले डिप्लोमा धारक इंजिनिअरिंग बीए बीकॉम पदवीधर व इतर विद्यार्थ्यांसाठी नामांकित कंपन्या मुलाखत घेण्यासाठी हजर राहणार आहेत सुशिक्षित बेरोजगार विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्याचा दाखला शैक्षणिक मार्कशीट आधार कार्ड दोन फोटो झेरॉक्स प्रति प्रत्येकी दोन प्रत सोबत घेऊन यावे, असे आवाहन मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर